नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २० * * अमरावती * रविवार, दिनांक २० जुलै २०२५ पुरवणीसह पाने ८ किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त




## अल्पवयीन मुलीवर पेट्रोल ओतून जिवंत जाळले

**■ वृत्तसंस्था, भुवनेश्वर, दि. १९ :** ओडिशातील पुरी येथे शनिवारी तीन जणांनी एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पेट्रोल ओतून तिला जाळून टाकले. मुलीला गंभीर अवस्थेत एम्स भुवनेश्वरमध्ये दाखल करण्यात आले आहे. तिची प्रकृती गंभीर आहे. पुरी जिल्ह्यातील बयाबार गावात ही घटना घडली जेव्हा पीडित मुलगी तिच्या मैत्रिणीच्या घरी जात होती. वाटेत तीन हल्लेखोरांनी तिला थांबवले आणि तिच्यावर पेट्रोल ओतून तिला पेटवून दिले. ही घटना बालंगा पोलीस ठाण्यापासून १.५ किमी अंतरावर घडली. तिन्ही आरोपी फरार आहेत, पोलिसांनी शोध मोहीम सुरू केली आहे. विद्यार्थिनीला का पेटवण्यात आले याचे कोणतेही कारण अद्याप समोर आलेले नाही.

# ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्रात होणार जागतिक दर्जाचे संशोधन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत महत्त्वाचा करार

**■ वृत्तसंस्था छत्रपती संभाजीनगर, दि. १९ :** राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात नवसंशोधन, आधुनिक धोरणनिर्मिती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याला चालना देणारा ऐतिहासिक टप्पा गुरुवारी गाठण्यात आला. महाराष्ट्र शासन आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, बर्कले यांच्यात ऊर्जा संशोधन आणि धोरण विकास या क्षेत्रात सामंजस्य करार करण्यात आला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात हा करार झाला. यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, तसेच महावितरण, महानिर्मिती व महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी आणि कॅलिफोर्निया विद्यापीठाचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रात अनेक महत्त्वपूर्ण बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे. त्यात ऊर्जा साठवणूक प्रणालींचे तांत्रिक संशोधन, स्वच्छ, विश्वासार्ह आणि परवडणाऱ्या विजेचा विकास, वीज बाजार रचना आणि धोरणात्मक सुधारणा, ग्रीड व प्रसारण यंत्रणांमध्ये नवोन्मेष, हवामान बदलाशी जुळवून घेणारी धोरणे, कौशल्यविकास आणि प्रशिक्षण उपक्रम आदिंचा समावेश करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, कॅलिफोर्निया विद्यापीठासारख्या नावाजलेल्या संस्थेशी सहकार्यामुळे महाराष्ट्रातील ऊर्जा क्षेत्रात जागतिक दर्जाचे संशोधन आणि धोरणात्मक काम सुरू होणार आहे.

हा करार म्हणजे स्वच्छ, विश्वासार्ह आणि शाश्वत ऊर्जा क्षेत्राच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

**स्थानिक गरजांनुसार उपाययोजना**

ऊर्जा क्षेत्रात स्थानिक पातळीवरील आव्हानांना तोंड देण्यासाठी हा करार लवचिक स्वरूपाचा असून भविष्यातील विविध प्रकल्पांनुसार सहकार्याच्या संधी खुल्या राहतील. राज्यातील विद्यापीठे, संशोधन संस्था आणि ऊर्जा कंपन्यांना यातून जागतिक दर्जाचे ज्ञान आणि प्रशिक्षण मिळेल.

ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला यांनी कॅलिफोर्निया विद्यापीठाचे वरिष्ठ सल्लागार मोहित भार्गव यांच्यासोबत सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या.

या वेळी बोलताना शुक्ला म्हणाल्या, हा करार केवळ धोरणात्मक नाही, तर कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

## ३ महिला भाविक चंद्रभागेत बुडाल्या

**■ वृत्तसंस्था, सोलापूर, दि. १९ :** पंढरपुरातील चंद्रभागा नदीत बुडून ३ महिला भाविकांचा मृत्यू झाला आहे. यापैकी २ महिलांचे मृतदेह आढळले असून, एकीचा शोध सुरू आहे. मृतांपैकी दोघी जालना जिल्ह्यातील भोकरदनच्या असल्याची माहिती आहे. या घटनेमुळे पंढरपुरावर शोककळा पसरली आहे.

उजनी धरणातून पाणी सोडल्यामुळे चंद्रभागा नदी सध्या दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे पाण्याचा अंदाज येत नाही शनिवारी सकाळी ७ च्या सुमारास ३ महिला भाविक चंद्रभागा नदीत स्नानासाठी उतरल्या होत्या.

यात जालन्याच्या भोकरदन येथील २ महिलांसह एका अनोळखी महिलेचा समावेश होता. त्या नदीत उतरल्या, पण पाण्याचा अंदाज न आल्याने त्या वाहून जाऊ लागल्या. ते पाहून नदीच्या किनाऱ्यावर असणाऱ्या इतर महिला भाविकांनी आरडाओरडा सुरू केला. पण पाण्याचा वेग जास्त असल्यामुळे मदत येईपर्यंत तिन्ही महिला बुडाल्या.

त्यानंतर पोलिसांनी स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीने मदतकार्य सुरू केले. त्यात सुनीता सपकाळ (४३) व संगीता सपकाळ (४०) या दोन महिलांचे मृतदेह आढळले. या दोन्ही महिला जालन्याच्या भोकरदन येथील रहिवासी आहेत. तर इतर एका अनोळखी महिलेचा शोध सुरू आहे.

चंद्रभागा नदीची पाणी पातळी वाढल्यामुळे प्रशासनाने घटनास्थळी खबरदारीच्या योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक होते. पण प्रशासनाने त्याकडे कानाडोळा केल्यामुळे या महिलांचा बळी गेला. किमान आता तरी प्रशासनाने या प्रकरणी योग्य ते पाऊल उचलण्याची गरज व्यक्त केली जात आहे. उल्लेखनीय बाब म्हणजे आषाढी यात्रेच्या काळात स्थानिक कोळी बांधवांच्या मदतीने प्रशासनाने अनेक भाविकांचे प्राण वाचवले होते. पण यात्रा संपल्यानंतर प्रशासनाने त्याकडे साफ दुर्लक्ष केले.

## थोडक्यात

### सक्षमीकरणाने देश वाढेल

**■ पुणे :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख मोहन भागवत म्हणाले की, महिलांना मागासलेल्या परंपरा आणि रूढींपासून मुक्त करणे खूप महत्वाचे आहे.



पुरुषांनी असा भ्रम बाळगू नये की ते महिलांचे उत्थान करतील. देवाने महिलांना केवळ पुरुषांइतकेच क्षमता दिल्या नाहीत तर त्यांना विशेष बनवणारे अतिरिक्त गुण देखील दिले आहेत, असेही ते एका कार्यक्रमात म्हणाले.

### मेक इन इंडिया प्रत्यक्षात असेंबल इन इंडिया

**नवी दिल्ली :** काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी शनिवारी सरकारच्या मेक इन इंडिया उपक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ते म्हणाले की हे केवळ असेंब्लींग करत आहे, उत्पादन नाही. जोपर्यंत भारत उत्पादनात स्वयंपूर्ण होत नाही तोपर्यंत रोजगार, विकास आणि मेक इन इंडियाच्या चर्चा फक्त भाषणेच राहतील.



राहुल यांनी एक्स वर हिंदीमध्ये लिहिलेल्या पोस्टमध्ये लिहिले आहे की- भारत केवळ जमिनीवर बदल घडवून आणून आणि असेंब्ली लाईनच्या पलीकडे जाऊनच उत्पादन शक्ती बनू शकतो. तरच आपण चीनशी स्पर्धा करू शकू. राहुल यांनी ग्रेटर नोएडा येथील स्थानिक टीव्ही असेंब्ली युनिटला भेट दिली. त्यांनी ७ मिनिटांचा व्हिडिओ देखील शेअर केला.

### मां काली ढोकळा खात नाही

**कोलकाता :** टीएमसी खासदार महुआ मोईत्रा यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली आहे आणि लिहिले आहे की बंगाली मतांसाठी माँ कालीचे आवाहन करण्यास थोडा उशीर झाला. ती ढोकळा खात नाही आणि ती कधीही खाणार नाही.



पश्चिम बंगालमधील दुर्गापूर येथे पंतप्रधान मोदींच्या रॅलीच्या एक दिवसानंतर हे विधान आले. खरं तर, रॅलीदरम्यान पंतप्रधानांनी माँ काली आणि दुर्गेच्या नावाचा जयघोष केला होता. महुआंनी वर या घोषणेवरून मोदींना लक्ष्य केले आहे. कारण पंतप्रधान मोदी गुजरातचे आहेत आणि ढोकळा हा तेथील एक प्रसिद्ध पदार्थ आहे. तर माँ काली आणि दुर्गा बंगाली संस्कृतीचे प्रतीक आहेत.

## सहा नक्षली ठार

**■ वृत्तसंस्था, जगदलपूर, दि. १९ :** छत्तीसगडमधील नारायणपूर जिल्ह्यातील अबुझमद येथे पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. दुपारी दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात जवानांनी ६ माओवाद्यांना ठार मारले आहे. सर्वांचे मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. घटनास्थळावरून एके-४७ आणि एसएलआर रायफलसारखी शस्त्रे देखील जप्त करण्यात आली आहेत.

बस्तरचे आयजी सुंदरराज पी यांनी चकमकीची पुष्टी केली आहे. चकमकीच्या ठिकाणाहून शस्त्रे तसेच स्फोटके आणि दैनंदिन वापराच्या वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत. चकमकीच्या ठिकाणी अजूनही शोध मोहीम सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, माओवाद्यांच्या उपस्थितीच्या माहितीवरून सुरक्षा दलांच्या संयुक्त पथकांनी शोध मोहीम सुरू केली होती. यादरम्यान, शुक्रवारी दुपारी अबुझमद परिसरात नक्षलवाद्यांशी चकमक झाली. नक्षलवाद्यांनी गोळीबार सुरू केला. जवानांनी प्रत्युत्तरादाखल ६ नक्षलवाद्यांना ठार केले.

छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांनी '' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लिहिले, नारायणपूर जिल्ह्यातील अबुझहमदमध्ये नक्षलवाद्यांविरुद्ध सुरक्षा दलांच्या मोठ्या कारवाईत, आतापर्यंत ६ नक्षलवाद्यांना निष्क्रिय केल्याच्या बातम्या येत आहेत. या ऑपरेशनमध्ये सहभागी असलेल्या सर्व शूर सुरक्षा कर्मचाऱ्यांचे मी अभिनंदन करतो आणि त्यांच्या अदम्य धैर्याला सलाम करतो. सैनिकांच्या शौर्यामुळे 'नक्षलमुक्त छत्तीसगड'चा आमचा संकल्प आणखी मजबूत झाला आहे.

## बापाने मुलीला एका लाखात विकले

### शासकीय नोकरीसाठी तिसरे अपत्य अडथळा

**■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. १९ :** शासकीय नोकरी मिळवण्यासाठी एका पित्याने आपल्या तिसऱ्या मुलीला दुसऱ्याला देऊन टाकल्याचा धक्कादायक प्रकार नांदेड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. नोकरीस अडथळा ठरेल या भीतीने एका बापाने स्वतःच्या मुलीचा सौदा केल्याचा आरोप पत्नीने केला असून, पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

नांदेड येथील रहिवासी सुरेखा यांचा विवाह 2009 साली गजानन वांजरखेडे यांच्याशी झाला होता. या दाम्पत्याला एक मुलगा आणि दोन मुली आहेत. 2011 मध्ये गजानन यांचे वडील निधन पावले.

त्यानंतर गजानन यांना अनुकंपा तत्वावर 2018 मध्ये हिंगोली येथील दुय्यम उपनिबंधक कार्यालयात शिपाई पदाची नोकरी लागणार होती. मात्र, सरकारी नोकरी मिळवण्यासाठी फॉर्ममध्ये 'तिसरं अपत्य नाही' असा उल्लेख आवश्यक असल्यामुळे गजानन याने आपल्या तिसऱ्या मुलीला दुसऱ्या कुटुंबाकडे सोपवण्याचा विचार होता. पत्नीने याला विरोध केला. त्यामुळे गजाजनने तिलाही घराबाहेर हाकलून दिले. सुरेखा यांनी पुढील काही वर्षे मजुरी करून आपला उदरनिर्वाह केला.

सुरेखा यांना काही महिन्यांपूर्वी आपल्या तिसऱ्या मुलीबाबत माहिती मिळाली . कागदपत्रांवर वडिलांचे नाव गजानन नव्हे, तर दुसऱ्याच व्यक्तीचे आहे. एनजीओने मुलगी राहत असलेल्या गावात जाऊन तपास केला. शाळेतील कागदपत्रे आणि जन्म प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतर मुलीच्या वडिलांच्या नावात गोंधळ आढळून आला. सुरेखा यांनी नांदेडच्या भाग्यनगर पोलिस ठाण्यात पतीविरुद्ध तक्रार दाखल केली.

## दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा

### अंबादास दानवे यांचे मोठे विधान

**■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १९ :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येण्याबाबत मोठे विधान केले आहे.



शिवसेना फुटल्याची खंत असून, दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात, अशी आशा असल्याचे ते म्हणालेत. शिवसेना म्हणून आपण एकत्र असले पाहिजे, शिवसेनेची एकत्रित ताकद राज्याला दिसली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. एकीकडे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे दोन्ही शिवसेना एकत्रित येण्याची अपेक्षा अंबादास दानवे यांनी केली.

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपत आहे. या पार्श्वभूमीवर नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांचा निरोप समारंभ पार पडला. दानवेंच्या निरोप समारंभाच्या भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांची एकमेकांवरील टोलेबाजी पाहायला मिळाली. आता अंबादास दानवेंच्या उपरोक्त विधानामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

अंबादास दानवे यांनी नुकतीच मुलाखत दिली. यावेळी त्यांना दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात असे तुम्हाला वाटते का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अंबादास दानवे म्हणाले, मी तेवढा मोठा नाहीये. पण निश्चित मी त्यादिवशी सुरुवातीलाच म्हटले की, मनाला वेदना झाल्या.

जी संघटना अखंड ताकदवान होती, ठीक आहे, सत्तेत बसणे वगैरे, आम्ही काय सत्तेसाठी जन्माला आलेलो नाहीत. सत्ता येईल आणि जाईल. पण जी संघटना फुटली त्याच्या वेदना मनाला आणि हृदयाला झालेल्याच होत्या. या वेदना कधी ना कधी भरुन निघाव्यात असे मनाला वाटत असते.

सगळे एकत्र असले पाहिजे. सगळे लोकं असले पाहिजेत. कारण आपली शिवसेनेचे राज्य असले पाहिजे. आपली महाराष्ट्रात ताकद असली पाहिजे, आशा ठेवायला काही हरकत नाही.

मी कुणाविषयी वैयक्तिक सल ठेवणार नाही. पण मनाला ही सल कायम आहे की, आपली एवढी मजबूत संघटना कुणीतरी फोडली. तिला कुणाची तरी दृष्ट लागली. संघटना तेवढीच मजबूत व्हावी हीच माझी इच्छा आहे, असेही अंबादास दानवे म्हणाले.

## रेल्वेने आणले इंटिग्रेटेड ॲप

### रेल्वेच्या सर्व सेवा एकाच क्लिकवर उपलब्ध

**■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :** रेल्वेचे तिकीट, धावत्या गाडीत जेवण, मदत किंवा तक्रार यासह प्रवासादरम्यान आवश्यक गोष्टी रेल्वेने एका क्लिकवर उपलब्ध केल्या आहेत. सिंगल साइन व ई-वॉलेटची सुविधा या ॲपमध्ये सिंगल साइन ऑन (एसएसओ) ची सुविधा देण्यात आली आहे.

यामुळे वापरकर्ते पूर्वी वापरत असलेल्या यूटीएस ऑन मोबाईल किंवा रेल कनेक्ट या ॲपचा लॉगिन वापरून सहज साइन करू शकतात. आर-वॉलेट ही सुविधाही यामध्ये समाविष्ट केली आहे. त्यातून जलद आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट करता येते. यात सुरक्षेसाठी एमपीन व बायोमेट्रिक प्रमाणीकरणाचे पर्याय दिले

डिजिटल इंडिया मोहीम अंतर्गत रेल वन ॲपमध्ये रेल्वे प्रवासातील सर्वच सुविधा एकत्रित करण्यात आल्या असून, यातून प्रवाशांना आता वेगवेगळे ॲप्स किंवा वेबसाईट्स वापरण्याची गरज राहणार नाही.

विशेष म्हणजे हे ॲप प्रवाशांसह मालगाडी सेवा घेणाऱ्या व्यापाऱ्यांसाठीही उपयोगी ठरणार आहे. आरक्षित, अनारक्षित व प्लॅटफॉर्म तिकीट, रेल्वेचे प्रत्यक्ष लोकेशन, पीएनआर चौकशी, रेल मदत, जेवणाचे बुकिंग एवढेच नाही तर मालवाहतुकीशी संबंधित चौकशी अशा वेगवेगळ्या ॲपमध्ये मिळणाऱ्या सुविधा आता एकाच ॲपमध्ये उपलब्ध झाल्या आहेत. मध्यरेल्वेने यासाठी रेल वन हे ॲप विकसित केले आहे. वेगवेगळे ॲप वापरण्यापेक्षा हा एकच ॲप प्रवाशांना फायदेशीर ठरेल, असा विश्वास मध्य रेल्वेने व्यक्त केला आहे.

**ॲपच्या मुख्य सुविधा**

आरक्षित, अनारक्षित व प्लॅटफॉर्म तिकीट बुकिंग
गाडीचे लोकेशन (रिअल-टाइम रनिंग स्टेटस)
पीएनआर तपासणी व चौकशी
प्रवास नियोजन व गाडी वेळापत्रक
ऑनबोर्ड जेवण बुकिंग (ई-कॅटरिंग सेवा)
रेल मदत तक्रार निवारण यंत्रणा आहेत.
मालवाहतूक संदर्भातील चौकशी
सरळ इंटरफेस गेस्ट लॉगिनचा पर्याय
या ॲपचा इंटरफेस वापरण्यास सोपा आणि आकर्षक असून, नव्या वापरकर्त्यांसाठी फक्त प्राथमिक माहिती देऊन नोंदणी करता येते.

## वैष्णवी हगवणे हुंडाबळी प्रकरण चौकशी अहवाल समोर

### तपासात गंभीर त्रुटी, सुपेकरांवर कारवाईची शिफारस

**■ महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १९ :** वैष्णवी हगवणे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी विधिमंडळाच्या महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीने प्रथम अहवाल सादर करत तपास प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचे नमूद केले आहे.



हा प्रकार केवळ आत्महत्येचा नसून, हे प्रकरण स्पष्टपणे कौटुंबिक अत्याचार, हुंडाबळी व अमानुष छळाचे असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. त्यामुळे तपासाची दिशा बदलून संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी शिफारस करण्यात आली आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारच्या वतीने आमदार मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने शुक्रवारी विधानसभेत आपला अहवाल सादर केला.

समितीच्या निरीक्षणानुसार, वैष्णवी यांच्यावर पती व सासरच्या लोकांकडून सातत्याने छळ, मारहाण व मानसिक अत्याचार करण्यात येत होता. यासोबतच हुंड्याच्या माध्यमातून ब्रँडेड गाडी, चांदीची भांडी, दागिने व रोख रक्कम घेतल्याचे ठोस पुरावे समितीपुढे सादर करण्यात आले आहेत.

या प्रकरणाचा तपास अत्यंत संथ गतीने सुरू असून, आरोपी वा सहआरोपी कोणतेही पुरावे नष्ट करून सुटून जाऊ नयेत यासाठी तातडीने कठोर पावले उचलण्याची गरज असल्याचे समितीने सरकारला सूचना केल्या आहेत.

पुण्यातील तत्कालीन पोलिस महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांचा या प्रकरणात प्रत्यक्ष सहभाग असल्याचे पुरावे समोर आल्याचे समितीने नमूद केले. सुपेकर यांच्या एका संभाषणाची ध्वनीफित सार्वजनिक झाली असून, तिची न्यायवैद्यकीय (फॉरेन्सिक) तपासणी करून, सुपेकर यांना तत्काळ निलंबित करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

याचप्रमाणे, त्यांच्या पत्नीच्या बँक खात्यात ह्युरुखवतह्न या नावाखाली आलेली हुंड्याची रक्कमही संशयास्पद असल्यामुळे सुपेकर पती-पत्नींना सहआरोपी म्हणून तपासात सामील करण्याचे आदेश देण्यात यावेत, असे समितीने स्पष्ट केले आहे.

## लग्नाच्या बाराव्या दिवशीच नवविवाहितेला विष पाजून मारले

### एक लाख रुपयांसाठी केली हत्या

**■ वृत्तसंस्था, नांदेड, दि. १९ :** हुंड्यातील १ लाख रुपये न आणल्याने सासरच्या लोकांनी नवविवाहितेला लग्नानंतर अवघ्या १२ दिवसांनी विष पाजून मारले. राठोडवाडी (अखरगा) (ता.मुखेड) येथे ही घटना घडली. ताऊबाई सुधाकर राठोड (१८) असे मृत नवविवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी पतीसह सासरा, सासू व दिरावर गुन्हा दाखल झाला. पती सुधाकरला अटक केली आहे.

वसूर तांडा येथील वामन चव्हाण यांची मुलगी ताऊबाई हिचे लग्न राठोडवाडी (अखरगा) येथील सुधाकर राठोडसोबत २ जुलैला झाले. लग्नात ६ लाख रुपये हुंडा व ३ तोळे सोने देण्याचे ठरले होते. मुलीचे वडील वामन चव्हाण यांनी लग्नावेळी ५ लाख रुपये हुंडा, एक तोळ्याची अंगठी व २ तोळ्यांचे लॉकेट दिले. लग्नानंतर मुलगी व जावयास परतणीसाठी बोलावले होते. त्या वेळी सुधाकरने हुंड्याचे राहिलेले १ लाख घेऊन ये, मला दूध डेअरी टाकायची आहे, अशी धमकी ताऊबाईला दिली. नंतर ती ९ जुलैला सासरी गेली.

त्यानंतर १० जुलैला सकाळी ७ वाजता ताऊबाईला उलट्या होत आहेत, लवकर या, असा निरोप मुलीच्या वडिलांना दिला. त्याप्रमाणे वामन चव्हाण मुलीच्या सासरी गेले. त्यानंतर ताऊबाईला मुखेडमध्ये प्राथमिक उपचार करून नांदेडला व तेथून हैदराबादला हलवले. मात्र, उपचार सुरू असताना १३ रोजी सायंकाळी ६ वा. तिचा मृत्यू झाला.

याप्रकरणी मुलीचे वडील वामन चव्हाण (रा.वसूर तांडा) यांच्या तक्रारीवरून मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

**मृत्यूपूर्वी दिला जबाब**

पती, सासरा, सासू आणि दीर यांनी मला जबरदस्तीने विष पाजल्याचे ताऊबाईने मृत्यूपूर्वी १२ जुलैला सांगितले होते. त्यानंतर १३ जुलैला सायंकाळी हैदराबाद येथील खासगी रुग्णालयात तिचा मृत्यू झाला.

दरम्यान, या हत्या प्रकरणाने प्रचंड संताप व्यक्त केला जात असून, कठोर शासन करण्याची मागणी होत आहे.



# राजुरा वासी व बेळा वासीयांची घरकुलासाठी आरक्षित जागा हडपली!

**अतिक्रमण हटवण्याची नागरिकांची जोरदार मागणी ■ मागण्या पूर्ण न झाल्यास 'क्रांती दिनी' रस्ता रोको आंदोलनाचा इशारा**



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी,( दि.19 )**– राजुरा व बेळा गावातील नागरिकांच्या घरकुलासाठी आरक्षित जागेवर अवैध अतिक्रमण झाल्याची तक्रार जोर धरू लागली आहे. यासंदर्भात स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून, त्यांनी त्वरित अतिक्रमण हटवण्याची मागणी केली आहे. अन्यथा, येत्या 9 ऑगस्ट 'क्रांती दिन' रोजी साखळी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

ही जागा निकिता हुंका पवार व त्यांच्या संस्थेद्वारे कथितपणे हडपल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. याविरोधात गिरीश चौधरी यांच्या नेतृत्वात 30 जानेवारी ते 1 फेब्रुवारी 2025 दरम्यान 3 दिवसीय आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनात चौधरी यांनी अन्नत्याग आंदोलन तर बेळा वासीयांनी साखळी उपोषण केले होते. या प्रकरणाची सांगता नायब तहसीलदार राजीव दंडाळे यांच्या उपस्थितीत झाली होती. तसेच जिल्हाधिकारी अनिल भटकर, तहसीलदार विजय लोखंडे यांनाही निवेदन देण्यात आले होते. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई झाली नसल्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप आहे.

दिनांक 15 जून 2025 रोजी निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा परिषद सीईओ, गट विकास अधिकारी यांना सुद्धा निवेदन देण्यात आले. आंदोलनाची भूमिका मांडताना गिरीश चौधरी (संस्थापक, जानता युवा संघटना) यांनी सांगितले की, जर लवकरात लवकर अतिक्रमण हटवण्यात आले नाही, तर 'क्रांती दिन' 9 ऑगस्ट रोजी राजुरा आणि बेळा येथे मोठे साखळी रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल. असा इशारा पद्माकर शेळके, अंगुरी पवार, संजीवनी वानखडे, टेकाडे बंधू-भगिनी, शारदा शेळके (ग्रामपंचायत सदस्य), चंद्रशेखर पतंगराय, हरीश नांदेडकर, मयलेश चव्हाण, प्रविण मुंजाळे, योगेश मानकर, संगीता, चित्रा, मनोज, राहुल, ऋषी, वंदेश, भोसले बंधू, पवार बंधू, चव्हाण बंधू, विठोरी, मयांक, यमदास, खोडके, अनिकेत व सुमारे 100 गावकऱ्यांनी दिला आहे.

# नियमबाह्य वाहन चालवणाऱ्या विरुद्ध पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर ( दि.19 )** – नियम धाब्यावर बसवून मनमानी दुचाकी तीन चाकी आणि चार चाकी वाहन चालवणाऱ्या विरुद्ध पोलिसांनी तीन दिवसापासून सुरू केलेली धडक सुरूच आहे, या कारवाईमूळे अनधिकृतपणे वाहन चालविणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

दि 15 जुलै मंगळवार पासून अचलपूर पोलीस स्टेशनचे भरारी पथक सकाळ पासून दुल्हागेट मार्गावरील चौफूलीवर अचानक येऊन दाखल झाले होते दुचाकीवर ट्रिपल शीट, ?टोत क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी बसवणे, गाड्यांची कागदपत्र नसणे हे सर्व पोलीस तपासत असून नियमबाह्य गाडी चालवणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली गेल्या तीन दिवसात आजपर्यंत पोलिसांनी 102 गाड्यांवर कारवाई करून त्यांचे कडून 74 हजार 200 रुपये दंड वसूल केला तर आज गुरुवारी संपूर्ण शहरात नियमबाह्य वाहन धारकांच्या विरोधात पोलिसांनी मोहीम राबवली एकूण 32 वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येऊन त्यांच्याकडून बावीस हजार रुपये दंड वसूल करण्यात आला चालवीणाऱ्यांना अडवून गाडीवरील 2 शीट उतरवून त्यागाडीवर पोलीस कर्माच्यारी बसून गाडी पोलीस स्टेशन मध्ये नेऊन कार्यवाही करीत असल्याचे विश्वसनीय माहिती मिळाली या कार्यवाही मध्ये 1 पोलीस उपनिरीक्षक सोबत 10 ते 15 आर. सी पी पोलीस कडून होत असतांना शहरात ऐकच तारांबळ उडाली या कार्यवाही मुळे टू व्हीलर गाडी चालवीणाऱ्यांना वाहन क्षमता शीट बसविण्याचे नियमाला चालना मिळणार असल्याचे नागरिकांमध्ये बोलल्या जात आहे या कारवाही मध्ये पी. आय. गजानन मेहेत्रे, सहाय्यक उपनिरीक्षक जमील, अमरसिंग जांभेकर आदींनी केली.

# 'एरिया-91' रेस्ट्रो बारचा मालक पीसीआरमध्ये

**पोक्सो व महाराष्ट्र दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल**

### फेक वेडिंग पार्टीतील मद्यसेवनाचे प्रकरण

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 19 )** – शंकर नगर परिसरातील 'एरिया-91 रेस्ट्रो बार' मध्ये 'फेक वेडिंग पार्टी' च्या नावाखाली अल्पवयीन मुलामुलींना अवैधरित्या प्रवेश देत मद्यसेवन घडवून आणल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी बार मालक आनंद राजू भेले (वय 33, रा. देवरणकर नगर) याला अटक करून न्यायालयात हजर केले असता, त्याला एक दिवसाची पोलीस कोठडी (पीसीआर) सुनावण्यात आली आहे.

13 जुलै रोजी झालेल्या पार्टीवेळी जवळपास 70 ते 80 युवक-युवती बारमध्ये मद्यधुंद अवस्थेत आढळले. यामध्ये 40 अल्पवयीनांचाही समावेश होता. पोलिसांनी या सर्वांची वैद्यकीय तपासणी केली असून त्यातील चार मुलं नशेत असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पोक्सो कायद्याच्या कलमांचा समावेश करून गुन्हा अधिक गंभीर करण्यात आला आहे.

### पोलिस आयुक्तांची दखल

या गंभीर प्रकरणाची माहिती मिळताच पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी क्राईम ब्रँच युनिट-2 चे पीआय संदीप चव्हाण यांना कारवाईचे आदेश दिले. त्यांच्या नेतृत्वात रेस्टो बारवर छापा टाकण्यात आला आणि बार मालकासह फेक पार्टी आयोजक सैम हेमंत बजाज (रा. अनुप नगर) व इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# हॉटेलच्या आड बनावट दारूचा व्यवसाय

**■ हॉटेल रिच गार्डनवर उत्पादन शुल्क विभागाचा छापा**
**■ 1.17 लाखांच्या बनावट दारूच्या बाटल्या जप्त**



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 19 )** – रहाटगाव रोडवरील 'हॉटेल रिच गार्डन रेस्टॉरंट अँड बार' येथे उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली. छाप्यामध्ये तब्बल 1 लाख 17 हजार रुपये किमतीच्या बनावट दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या आहेत. या कारवाईत राज सुनील साहू आणि अनिल साहू (रा. रतनगंज) या दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत, मध्य प्रदेशातून अवैधरीत्या दारू आणून ती बनावट ब्रँडेड बाटल्यांमध्ये भरून विकली जात असल्याचे उघड झाले आहे.

पोलिस आणि उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली. या प्रकरणी पुढील तपास सुरू असून, बनावट दारूच्या साखळीचा माग काढण्याचा प्रयत्न सुरु आहे.

# 18 ग्रामपंचायती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्काराने सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.19 )** – संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छ ग्राम पुरस्कार आज नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती येथे एका प्रेरणादायी सोहळ्यात प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते 2022-23, 2023-24 व 2024-25 या तीन वर्षांसाठी निवड झालेल्या 18 ग्रामपंचायतींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या सोहळ्यात प्रथम, द्वितीय, तृतीय आणि विशेष पुरस्कार मिळालेल्या ग्रामपंचायतींना केवळ रोख रक्कमच नव्हे तर फ्रेम केलेले प्रमाणपत्र, शैक्षणिक साहित्य किट (6 वह्या, 10 पेन्सिल, 6 पेन एका थैलित) तसेच रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले. उल्लेखनीय बाब म्हणजे, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या संकल्पनेतून प्रेरणा घेऊन



शैक्षणिक किट गावातील गरजू विद्यार्थ्यांना सरपंचांमार्फत वितरित केली जाणार आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी केले, तर सूत्रसंचालन प्राजक्ता मसिदकर यांनी केले. यावेळी विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्रा,म.न.पा. आयुक्त सौम्या शर्मा, खा.डॉ. अनिल बोंडे, आ.संजय खोडके, माजी आमदार प्रविण पोटे, आ.केवलराम काळे, आ. राजेश वानखडे, आ. गजानन लवटे, आ. प्रवीण तायडे उपस्थित होते.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

**मागे राहिले कोवळं कुटुंब**

**महासागर प्रतिनिधी**
**दर्यापूर, ( दि. 19 )** – कर्जाच्या ओझ्याखाली होरपळलेल्या दर्यापूर तालुक्यातील तरुण शेतकरी संदीप रामराव डहाके (वय अंदाजे 35) यांनी स्वत:च्या राहत्या घरी गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.

संदीप डहाके यांच्या शेतावर महाराष्ट्र बँकेचे लाखो रुपयांचे कर्ज असल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक विवंचना आणि कर्जफेडीचा ताण सहन न झाल्यामुळे त्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा आणि दोन चिमुकल्या मुलींना सोडून गेलेल्या संदीप यांच्या आत्महत्येमुळे संपूर्ण गावात हळहळ व्यक्त केली जात आहे. डहाके कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. ही घटना शेतकरी आत्महत्यांच्या गंभीर स्थितीकडे पुन्हा लक्ष वेधते आहे. प्रशासनाकडून अद्याप कोणतीही मदत जाहीर झालेली नाही.

# ग्रामसेवक गजानन गिद यांचे दु:खद निधन

### बेनोडा शहीद येथे झाला अंत्यविधी

**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.19 )** – येथील जेष्ठ व कर्तव्यनिष्ठ ग्रामसेवक भास्करराव उर्फ गजाननराव गिद (वय अंदाजे 52) यांचे दि.18 जुलै 2025 रोजी रात्री 8 वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने बेनोडा शहीद परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर अंत्यविधी दि.19 जुलै 2025 शनिवार रोजी दुपारी 1 वाजता त्यांच्या मूळ गावी बेनोडा शहीद येथे झाला. गिद यांनी आपली संपूर्ण सेवा ग्रामविकासासाठी वाहून घेतली होती. ग्रामसेवक म्हणून त्यांनी गावाच्या सर्वांगीण विकासात मोलाचा वाटा उचलला. ग्रामपंचायतीच्या विविध कामकाजात त्यांनी पारदर्शकता आणि कर्तव्यनिष्ठेने काम करत गावकऱ्यांच्या मनात आपले स्थान निर्माण केले. त्यांच्या सेवाभावी



वृत्तीमुळे ते गावकऱ्यांत लोकप्रिय होते. गावातील ज्येष्ठ मंडळी, सहकारी आणि नागरिकांनी त्यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केले असून, 'गावाने एक चांगला कार्यकर्ता गमावला', अशा शब्दांत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याची शक्ती प्रदान करो, अशी सर्वत्र प्रार्थना केली जात आहे.

### भाईगिरीतून तरुणावर चाकूहल्ला

**अमरावती** – भाईगिरीतून एका तरुणावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचशिलनगरात उघडकीस आली.

# 'निर्धार नवपर्वाचा' कार्यकर्ता संवाद मेळावा

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर आयोजन**



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी,( दि.19 )** – मोर्शी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने 'निर्धार नवपर्वाचा' कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मोर्शी तालुक्यातील पक्ष संघटना बळकट करण्यासाठी आयोजित केलेली ही बैठक माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

या बैठकीस मोर्शी तालुक्यातील शहरातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित कार्यकर्त्यांना संघटनात्मक बळकटीकरण, जनसंपर्क वाढवणे, तसेच विकासाच्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे महत्व अधोरेखित करण्यात आले. या बैठकीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि उत्साह संचारला आहे. मेळाव्याला राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अंकुश घारड, तालुका अध्यक्ष रुपेश वाळके, निलेश रोडे, घनश्याम कळंबे, दिलीप गवई, पंकज हरणे, शेरा, रवी मानकर, हितेश साबळे, विपुल हिवसे, शहर अध्यक्ष मयूर राऊत, राज बडोदेकर, अक्षय ढोमणे, अभिजित सावरकर, राहुल आमले, सतीश धुताले, कार्याध्यक्ष हितेश उंदरे, महेश नागले, प्राचेत गौड, गौरव गिरी, विवेक शहाणे, कांचन कुकडे, मनीष गुडधे, शुभम मिश्रा, प्रेम मडावी, शुभम पकडे, विक्रम पवार, प्रमोद मेश्राम, चेतन सोळंके, प्रदीप सोनवणे, अक्षय लांडे, अक्षय ढोले, राम साबळे, विलास इंगळे, हिराभाऊ भोसले, वैष्णव पवार, अज्जू सौदागर, राहुल कपिले, शिवा कपले, मयूर ठवळी, ऋषिकेश खवले, ऋषिकेश राऊत, अन्वर खान आदी पदाधिकारी मेळाव्याला उपस्थित होते.

### सख्या भावाकडून मारहाण

**अमरावती** – फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बिच्छु टेकडी परिसरात दोन सख्या भावांचा वाद उफाळून आला. यावेळी एकाने दुसर्याला काठीने माराहाण केली. या घटनेची तक्रार शाम मारोतराव सहारे (रा. अमरावती) यांनी 17 जुलै रोजी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी किशन मारोतराव सहारे याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास फ्रेजरपुरा पोलिस करीत आहे.

# जूना मोटर स्टँड परिसर पाणी तुंबत असल्याने नागरिक त्रस्त

**अपघातांचे सत्र सुरूच, नगर परिषदेच्या उदासीनता**



**महासागर प्रतिनिधी**
**अचलपूर,( दि.19 )**– अचलपूर शहरातील जूना मोटर स्टँड परिसरात दरवर्षीप्रमाणे यंदाही प्रचंड प्रमाणात पावसाचे पाणी तुंबत असल्याने रस्त्यांची अवस्था बिकट झाली आहे. साचलेल्या पाण्यामुळे वाहनांचे घसरणे, पादचाऱ्यांचे पडणे आणि अपघातांची मालिका सुरू असल्याने स्थानिक नागरिक त्रस्त झाले आहेत.

या समस्येबाबत नागरिकांनी नगर परिषदेला अनेक वेळा निवेदने दिली असून, नाल्यांचे योग्य डायवर्शन व जलनिस्सारण यंत्रणेची सुधारणा करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, नगर परिषदेने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याचे आरोप होत आहेत. नगर परिषदेकडून सांगण्यात येत आहे की, संबंधित विभागात केवळ एकच अभियंता कार्यरत असल्यामुळे कामात विलंब होत आहे.

मात्र नागरिकांचे म्हणणे आहे की, ही समस्या नवीन नसून, दरवर्षी अशीच परिस्थिती उद्भवते, त्यामुळे कायमस्वरूपी उपाययोजना न करणे म्हणजे स्पष्ट दुर्लक्ष आहे. जूना मोटर स्टँड हे अचलपूरमधील प्रमुख वाहतूक केंद्र असून, येथे दररोज शेकडो वाहनांची व नागरिकांची वर्दळ असते. पाणी तुंबल्यामूळे रस्ते बंद पडतात व व्यापाऱ्यांना आर्थिक नुकसान सहन करावे लागते.

# पालकमंत्र्यांनी हस्तक्षेप करून कलाकारांची नेमणूक करावी!

**■ वृद्ध कलावंत निवड समिती अपूर्ण**
**■ 4 कलाकार व 1 साहित्यिक अद्यापही वंचित**





**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.19 )** – जिल्ह्यातील वृद्ध कलावंतांच्या सन्मानार्थ राजर्षी शाहू महाराज वृद्ध कलावंत सन्मान योजना अंतर्गत शासन दरमहा ?5,000 मासिक मानधन देते. मात्र, या योजनेसाठी नेमण्यात आलेली वृद्ध कलावंत निवड समिती सध्या अपूर्ण आहे. शासन नियमावलीनुसार 10 अशासकीय सदस्य असणे अपेक्षित असताना, सध्या फक्त 5 सदस्यांवर समिती कार्यरत आहे, यामुळे 4 मान्यवर कलाकार व 1 साहित्यिक यांची कमतरता जाणवते आहे.

कलावंतांच्या निवडीत निर्णय घेणाऱ्या समितीत प्रतिनिधिकता आणि पारदर्शकता असावी यासाठी नियमावलीत स्पष्ट तरतूद आहे. मात्र, जिल्ह्यात याकडे दुर्लक्ष होत असल्याने निवड प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. 14 जुलैपासून डॉ. पंजाबराव सभागृह, जिल्हा परिषद अमरावती येथे 100 वृद्ध कलावंतांची निवड करण्यासाठी मुलाखती सुरू असून, या अपूर्ण समितीच्या आधिपत्यातच ही प्रक्रिया पार पडत आहे. त्यामुळे योजनेच्या कार्यवाहीवर संशय व्यक्त होत आहे.

### अश्या आहेत मागण्या

यावेळी वृद्ध कलावंतांनी शासन निर्णयाच्या आधारे समितीमध्ये 4 मान्यवर कलाकार व 1 साहित्यिकाची तातडीने भरती करावी, जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालावे, निवड प्रक्रिया पारदर्शक व न्याय्य होण्यासाठी समितीची संपूर्ण रचना पूर्ण करावी, अशी मागणी केली आहे.

महासागर
रविवार, दि. 20 जुलै 2025
अमरावती


# विषारी औषधी पाजून शेतकऱ्यांची हत्या!

## चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा, आरोपी पसार

### पैसवाडा शिवारात थरार

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 )**- अचलपूर तालुक्यातील पैसवाडा शिवारात एका 60 वर्षीय शेतकऱ्याला जबरदस्तीने विषारी औषध पाजून ठार केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.२५ जून रोजी ही घटना घडली होती, मात्र 28 जून रोजी उपचारादरम्यान शेतकऱ्याचा मृत्यू झाला. संबंधित शेतकऱ्याची पत्नी शालिनी काळे यांनी 18 जुलै रोजी शिरजगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

मृत शेतकऱ्याचे नाव गजानन काळे (वय 60, रा. चिंचखेडा, कविठा, ता. अचलपूर) असे असून, त्यांच्या पत्नी शालिनी काळे (वय 54) यांच्या फिर्यादीवरून चौकीदार गवई, गूंजन चंद्रकुमार जैन (वय 47, रा. इंदूर, मध्यप्रदेश), सुरेश साबुजी खडके (वय 40, रा. टेंबुरसोडा, चिखलदरा) आणि एका अज्ञात इसमाविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, गजानन काळे यांच्या नावावर पैसवाडा शिवारात 8 एकर वडिलोपार्जित शेती होती. गूंजन जैन याने तीन वर्षांपूर्वी ही शेती आपल्याच नावावर करून घेतली होती, त्यामुळे दोघांत दीर्घकाळ वाद सुरू होता. चार महिन्यांपूर्वी गूंजन जैनने तीच शेती सुरेश खडके याला विकली होती.

25 जून रोजी, शालिनी काळे शेतात गेल्या असता, त्यांना गजानन काळे हे बेशुद्ध अवस्थेत आढळले. त्या वेळी गूंजन जैन, सुरेश खडके आणि दोघेजण झोपडीतून पळताना दिसले. थोड्याशा शुद्धीवर असताना गजानन काळे यांनी पत्नीला सांगितले की, चौकीदार गवई व एका अन्य व्यक्तीने जबरदस्ती विषारी औषध पाजले. तातडीने गजानन यांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, नंतर अमरावती जिल्हा रुग्णालयात हलवले गेले. मात्र, 28 जून रोजी त्यांचा मृत्यू झाला.

> फिर्यादीच्या आधारे आरोपींविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. चौकशी सुरू आहे. लवकरच आरोपींना अटक केली जाईल.
>
> **महेंद्र गवई, ठाणेदार, शिरजगाव**

**चौघांविरुद्ध खुनाचा गुन्हा**

घटनेनंतर मानसिकदृष्ट्या खचलेल्या शालिनी यांनी काही दिवसांनी तक्रार दाखल केली. त्यानुसार शिरजगाव पोलिसांनी चौघांविरोधात खुनाचा गुन्हा दाखल केला असून, आरोपी सध्या पसार आहेत.

# जप्त केलेल्या हातगाड्या आता स्क्रॅप होणार!

### महापालिका आयुक्तांचे आदेश

*महासागर प्रतिनिधी*

*अमरावती,( दि.19 ) – अतिक्रमण दरम्यान जप्त केलेल्या हात गाड्या अतिक्रमण करणाऱ्यांना परत न करता, पुन्हा रस्त्यावर येवू नये याकरिता त्या स्क्रॅप करण्याचे आदेश महापालिका आयुक्त शौम्या शर्मा ( चांडक ) यांनी शनिवारी दिले.*





प्रशांत नगर बगीच्याची पाहणी करत असताना त्या बगिच्याचा परिसरात या हातगाड्या ठेवल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी त्यांनी याबाबत चौकशी केली, तेव्हा कुणीतरी अधिकाऱ्यांनी राजापेठ येथील कार्यालयात जागा नसल्याने या हातगाड्या येथे आणल्या असाव्या असे सांगितले. यावर आयुक्त म्हणाल्या, 'राजापेठ येथे जागा नसल्याने गाड्या येथे आणल्या असतील, पण त्या पुन्हा रस्त्यावर आल्या तर कारवाईला अर्थ काय? एकही गाडी परत करू नका, सर्व गाड्या क्रॅश करा,' असा आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिला.

### बगीच्याची परिस्थिती पाहून आयुक्त संतापल्या

प्रशांत नगरमधील सार्वजनिक बगीच्या पाहणीदरम्यान महापालिका आयुक्तांनी बगीच्याची दयनीय अवस्था पाहून तीव्र नाराजी व्यक्त केली. 'इतका चांगला बगीचा असूनही त्याकडे दुर्लक्ष का झाले? मला हा बगीचा तातडीने चांगल्या स्थितीत हवा,' अशा स्पष्ट शब्दांत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना फटकारले. बगीच्यात अस्वच्छता, तुटलेले लाईट, देखभालीचा अभाव आणि नागरिकांच्या तक्रारी या सगळ्या गोष्टी आयुक्तांच्या निदर्शनास आल्याने त्यांनी तातडीने सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या. या भेटीदरम्यान अनेक नागरिकांनी कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेबाबत तक्रारी केल्या. आयुक्त येणार असल्याने सर्व यंत्रणा सज्ज होत्या, मात्र इतर दिवशी दुर्लक्ष केले जाते, अशी नागरिकांची भावना होती.याशिवाय, बगीच्याच्या शेजारी सुरू असलेले खाऊ गल्लीचे काम लवकर पूर्ण करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

### मग हे सफाई यंत्र कशासाठी?

त्याचबरोबर बगीच्याच्या बाजूलाच असलेल्या वाहन दुरुस्ती विभागात अग्निशमन आणि इतर वाहने तपासणी करत असताना, दुभाजकाच्या बाजूला असलेल्या मातीसाठी वापरण्यात येणाऱ्या सफाई यंत्राचा रस्त्यावर कधीही उपयोग होत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. तुमच्याकडे यंत्र आहे, तरी तुम्ही वापरत नाही, ही निष्काळजीपणा आहे, असे आरोग्य अधिकारी जाधव यांना त्यांनी स्पष्ट शब्दांत सुनावले.



### 'गिरी कुठे आहे? किती वेळा शोकॉज दिली?

पाहणी दरम्यान उद्यान विभागाचे गिरी यांना संबोधून आयुक्तांनी 'गिरी कुठे आहे? किती वेळा शोकॉज दिली?, तरीही परिस्थिती जैसेथे आहे, असे म्हणत जबाबदार अधिकाऱ्यांची कानउघाडणी केली. बगीच्यात वारंवार लाईटची तोडफोड होते, यावर आयुक्तांनी बगीच्यात फिरणाऱ्या नागरिकांना अशी तोडफोड होत असेल, तर तुम्ही स्वत: लक्ष ठेवा आणि प्रशासनाला माहिती द्या, असे आवाहन केले.



## घरफोडीत 95 हजाराचा मुद्देमाल लंपास

**अमरावती** – गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील वलगाव रोड स्थित रजनी मंगल कार्यालयाजवळ 17 जुलै रोजी एक घरफोडीची घटना उघडकीस आली. चोराने एका घरातून 95 हजाराचा मुद्देमाल लंपास केला आहे. या घटनेची तक्रार प्रकाश तुकाराम काळे (60, रा. अमरावती) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. या घटनेचा पुढिल तपास गाडगेनगर पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस कर्मचारी करीत आहे.

## मेळघाट, शेती आणि कायदा-सुव्यवस्थेवर आ. सुलभा खोडके यांची ठाम भूमिका

### पावसाळी अधिवेशनात तीन महत्त्वाच्या मुद्यांवर आवाज

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि.19)** – महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आमदार सुलभा खोडके यांनी तीन महत्वाच्या मुद्दयांवर शासनाचे लक्ष वेधले. यात मेळघाटातील पर्यावरण संवर्धन, विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न आणि अमरावती शहरातील कायदा-सुव्यवस्था यांचा समावेश होता.



मेळघाट व्याघ्र प्रकल्पात पाणवठे कोरडे, बंधारे मोडकळीस आणि वन्यजीव धोक्यात असल्याने त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, शासनाने प्रत्यक्ष दौरा करून उपाययोजना कराव्यात. यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी सफाई, गाळ काढणे आणि दुरुस्तीची कामे राबवण्याचे आश्वासन दिले. शेती क्षेत्रातील संकटांवर, खास करून अमरावती विभागात यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. खोडके यांनी रुंद-वरंबा सरी पद्धतीने फेरपेरणीसाठी अनुदान, कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र योजना, आणि एचटीबीटी बियाण्यांना मान्यता यांसाठी मागणी केली. यामुळे उत्पादन वाढेल, तण नियंत्रण सुलभ होईल आणि शेतकऱ्यांचा फायदा होईल, असे त्यांनी नमूद केले.

अमरावती शहरातील वाढती गुन्हेगारी, एमडी ड्रग्सचा प्रसार, अनैतिक धंदे, स्पा सेंटरच्या नावाखाली गैरप्रकार, यामुळे कायदा-सुव्यवस्था धोक्यात आली आहे. यावर खोडके यांनी मुख्यमंत्र्यांच्या हस्तक्षेपाची मागणी केली. तसेच, सीसीटीव्ही बसवणे, पोलिस पेट्रोलिंग वाढवणे, आणि अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यावर भर दिला.

# यास्मिन नगरमध्ये गुटखा विक्रीवर छापा

### 1.20 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 )** – नागपुरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील यास्मिन नगर परिसरात गुटख्याची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या दुकानावर पोलीस आणि अन्न सुरक्षा विभागाने संयुक्त कारवाई केली. या छाप्यात 1 लाख 20 हजार 946 रुपयांचा प्रतिबंधित गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले असून, एकाला अटक करण्यात आली आहे. दुसरा आरोपी सध्या फरार आहे.

18 जुलै रोजी, पोलीस उपनिरीक्षक गजानन विधाते पेट्रोलिंग करत असताना त्यांना गुप्त माहिती मिळाली की यास्मिन नगर येथील एका दुकानात गुटखा विक्री होत आहे. त्यांनी ही माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक उरलागोंडावर यांना दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे आणि पंचासमक्ष छापा टाकण्यात आला.

कारवाईदरम्यान शेख अयान शेख इकबाल (वय 19) याला ताब्यात घेण्यात आले. दुकानात गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थ मोठ्या प्रमाणात आढळून आले. त्याच्याकडे भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरणाचा परवाना नव्हता. याप्रकरणी त्याच्यासह त्याचा मोठा भाऊ आणि दुकानमालक शेख सुफियान शेख इकबाल (रा. उस्मान नगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गुन्हा ब्न्क्ष्ट कलम 223, 274, 275, 328 तसेच अन्न सुरक्षा अधिनियम 59 अंतर्गत नोंदवण्यात आला असून, सुफियान फरार आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

# तीन लाखांचा गुटखा जप्त

### मोर्शी पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.19 )** – राज्यात बंदी असलेल्या सुगंधित गुटख्याची मोठ्या प्रमाणावर अवैध वाहतूक करणाऱ्या दोघांना मोर्शी पोलिसांनी माळू नदी पुलाजवळ रंगेहात अटक केली आहे. या कारवाईत सुमारे 3.71 लाख रुपयांचा गुटखा आणि 9.50 लाख रुपये किंमतीची इर्टिगा कार, असा एकूण 13.21 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शनिवारी (दि. 19 जुलै) स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीवरून मोर्शी-वरूड रोडवरील माळू नदी पुलाजवळ सापळा रचण्यात आला. तपासणीदरम्यान काळ्या रंगाची इर्टिगा कार थांबवून पोलिसांनी वाहनाची झडती घेतली असता, त्यामध्ये प्रतिबंधित तंबाखूजन्य सुगंधित गुटखा साठा आढळून आला. पोलिसांनी हाफिज खान साहेब खान (वय 42, रा. माहुली जहागीर) व त्याच्या एका साथीदाराला अटक केली असून, त्यांच्या विरोधात संबंधित कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोघांकडून मिळालेला गुटखा व वाहन असा एकूण 13,21,250 रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.



ही कारवाई अमरावती ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात पो.उपनिरीक्षक विशाल रोकडे, संतोष तेलंग, राजेश कासोटे, मारोती वैद्य, रमेश मुंडे, प्रदीप ईपर, चालक किशोर सुने, तसेच मोर्शी पोलीस ठाण्याचे ठाणेदार सूरज भोंडे आणि डिबी पथक कारवाईमध्ये सहभागी होते.

## साथीचे आजार बळावले; डेंग्यू, चिकनगुनिया रुग्णसंख्या वाढली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )**- जिल्ह्यात सतत बदलणाऱ्या हवामानामुळे सर्दी, खोकला, ताप यासारख्या व्हायरल इन्फेक्शनचे रुग्ण वाढले आहेत. यासोबतच डेंग्यू आणि चिकनगुनियाचेही रुग्ण वाढत असून, जिल्हा सामान्य रुग्णालयात एकाच खाटेवर दोन रुग्ण ठेवण्याची वेळ आली आहे.

रुग्णालय प्रशासनाने काही रुग्णांना इतर वॉर्डात हलवून तात्पुरती व्यवस्था केली आहे. मागील 15 दिवसांपासून रुग्णसंख्या झपाट्याने वाढत आहे. दररोज 60 ते 70 रुग्ण व्हायरल फिव्हरसाठी ओपीडीमध्ये, तर उपजिल्हा रुग्णालयात 120 ते 150 रुग्ण उपचारासाठी येत आहेत. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांतही दिवसाला 40 रुग्ण येत आहेत. जनावरी ते जून 2025 या कालावधीत 661 डेंग्यू संशयित नमुने तपासण्यात आले. त्यातील 52 रुग्ण पॉझिटिव्ह आढळले, यापैकी 35 ग्रामीण भागात आणि 17 शहरात. चिकनगुनियाचे 43 रुग्ण आढळले असून, ग्रामीण भागात 33 आणि शहरात 10 रुग्ण आहेत. जुलै महिन्याच्या सुरुवातीला घेण्यात आलेल्या 9 नमुन्यांपैकी 8 पॉझिटिव्ह आढळले, त्यात डेंग्यूचे 4 आणि चिकनगुनियाचे 4 रुग्ण होते.

# वीज कोसळून निंभी येथील शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

### शेतात काम करताना घडली दुर्घटना | पत्नी व मुलीवर दु:खाचा डोंगर

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ,( दि.19 ) :** निंभी येथील 53 वर्षीय शेतकरी मधुकर पैठणकर यांचा वीज पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना 18 जुलै रोजी सायंकाळी 5 वाजताच्या सुमारास घडली. पावसाच्या जोरदार सरींसह विजांच्या कडकडाटात ही दुर्घटना शेतशिवारात घडली.

मधुकर पैठणकर हे आपल्या मालकीच्या पाच एकर शेतात (मौजा पिंपळखुटा – लहान) नेहमीप्रमाणे निंदणीसाठी दुपारी 11 वाजता गेले होते. सायंकाळच्या सुमारास अचानक वातावरणात बदल होऊन विजांचा कडकडाट सुरू झाला. याचवेळी त्यांच्या अंगावर वीज कोसळल्याने ते जागीच ठार झाले. दुर्घटनेची माहिती शेजारच्या शेतकऱ्यांनी तातडीने गावात पोहोचवली. गावकऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन पाहणी केली असता, मधुकरराव हे मृतावस्थेत आढळून आले. यानंतर शिरखेड पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलीस निरीक्षक सचिन लुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी येथे पाठवण्यात आला.

19 जुलै रोजी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून मृतकाच्या पश्चात पत्नी आणि एक मुलगी असा आप्त परिवार आहे. शिरखेड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# चिखलदरामध्ये अलर्ट; पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त





### रविवारी पर्यटकांच्या गर्दीवर उपाययोजना | आठवडी बाजारावरही बंदी

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, ( दि.19 )** – पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर चिखलदराच्या निसर्गरम्य सौंदर्याचा आनंद घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात पर्यटक चिखलदराकडे वळत आहेत. मागील आठवड्यात तीन दिवसांत जवळपास 10,000 पर्यटकांच्या वाहनांची नोंद करण्यात आली. त्यामुळे चिखलदरा व परतवाडा मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. काही वाहनांना चार ते पाच तास वाट पाहावी लागली, तर अनेक पर्यटकांना आल्या पावली परत जावे लागले.

या घडामोडींमुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता, आणि अनेक पर्यटकांनी गैरसोयीबाबत नाराजी व्यक्त केली. परिणामी जिल्हा प्रशासनाने तातडीने याची दखल घेतली असून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. चिखलदरा परिसरातील सर्व महत्त्वाच्या पर्यटन स्थळांवर तसेच परतवाडा मार्गावर अतिरिक्त पोलीस तैनात करण्यात आले आहेत.

तालुका व जिल्हा प्रशासनानेही परिस्थितीवर लक्ष ठेवून प्रत्येक पॉइंटवर सुरक्षा व्यवस्था वाढवली आहे. पर्यटकांची वाढती संख्या, वाहतूक आणि सुरक्षितता या तीनही बाबींवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे. चिखलदऱ्याची अर्थव्यवस्था पर्यटकांवर अवलंबून असून, त्यांच्या सोयी-सुविधांसह सुरक्षिततेचे भान राखणे ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. वाढती गर्दी आणि व्यवस्थापन यामधील समतोल राखण्यासाठी प्रशासन सतर्क असल्याचे स्पष्ट दिसते.



### रविवारऐवजी गुरुवारी बाजार

पर्यटकांची रविवारी वाढती गर्दी लक्षात घेता तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानुसार चिखलदऱ्यातील रविवारचा बाजार बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी तात्काळ करण्यात आली असून पुढील आदेश येईपर्यंत रविवारचा बाजार भरवला जाणार नाही. नगरपालिका मुख्याधिकारी विजय लोकरे यांनी सांगितले की, रविवारच्या ऐवजी बाजार गुरुवारी भरवला जाणार असून यासाठी चिखलदरा नगरपालिकेने लेखी आदेश जारी केला आहे. हा निर्णय गर्दी नियंत्रणासाठी अत्यावश्यक असून नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जिल्ह्यात तीन महिन्यांत 13 हजार पट्ट्यांचे वाटप होणार - पालकमंत्री बावनकुळे

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 )** – जिल्ह्यात येत्या तीन महिन्यांत 13 हजार घरमालकांना पट्टे वाटप करण्यात येणार असून, यामुळे सुमारे पाच लाख घरे नियमित होणार आहेत, अशी माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समिती सभागृहात '100 दिवस कृती आराखडा' कार्यक्रमात ते बोलत होते.



संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या 18 ग्रामपंचायतींना प्रत्येकी 10 लाख रुपयांचा निधी दिला जाणार आहे. हा निधी जल पुनर्भरण, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि घनकचरा व्यवस्थापन यासाठी खर्च करावा, असेही ते म्हणाले. याशिवाय जिल्ह्यात 50 नवीन नर्सऱ्या स्थापन करून शासनाचे एक कोटी वृक्षलागवडीचे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्यात येणार आहे.

स्वच्छतेच्या अभियानात अमरावती जिल्ह्याचा सहभाग उल्लेखनीय ठरला असून, ग्रामपंचायतींनी मिळालेला निधी प्रभावी कामासाठी वापरण्याचे निर्देश देण्यात आले. यावेळी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील विजेत्या ग्राम पंचायतींना पारितोषिक, घरकुल लाभार्थ्यांना रेती पासचे वाटप, सिंधी समाजातील नागरिकांना पट्टे, अमरावती महापालिकेच्या व्हॉट्सॲप चॅटबोट आणि 'अमृत अंबानगरी' लोगोचे लोकार्पण करण्यात आले. घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना 5 ब्रास रेती देण्याचा निर्णयही यावेळी जाहीर करण्यात आला.

तसेच, 30 लाख घरांवर सौरऊर्जा बसवण्यात येणार असून विजेचे बिल शून्यावर येणार आहे. पालकमंत्री म्हणाले, बचतगटांना कर्ज दिल्यास महिला स्वत:चा व्यवसाय वाढवू शकतात. यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करून कर्ज वितरण गतीने करावे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांतर्गत वृक्षलागवड करावी, जेणेकरून पर्यावरणाचा समतोल राखता येईल.

यावेळी खासदार अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, आयुक्त सौम्या शर्मा, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र, उपजिल्हाधिकारी विवेक जाधव व इतर अधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैताली यादव यांनी केले, तर प्रास्ताविक अनिल भटकर यांनी केले.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# शाई फेकली, आता जशास तसे..



संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर ज्यांनी शाई फेकून व त्यांना काळे फासून मराठा व बहुजन समाजाचा अवमान केला, त्यांना जशास तसे उत्तर देण्यात येईल, एवढेच नव्हे तर त्यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा बदला दसपट घेतला जाईल, असा निर्धार संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांना बोलून दाखवला आहे.

--------------

प्रवीण गायकवाड यांच्यावर शिवधर्म संघटनेच्या अनुयायांनी महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट येथे हल्ला केला, त्या सात जणांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. त्यांनी केलेल्या हल्ल्याचा आम्ही निषेध करणार नाही तर त्यांना जशास तसे उत्तर देऊ असे सांगत संभाजी ब्रिगेडने यापुढे आपली लढाई भाजपा विरोधात असेल हे जाहीर केले आहे.

मुख्य आरोपी दीपक काटे हा अट्टल गुन्हेगार आहे व तो भाजयुमोचा पदाधिकारी आहे. संभाजी ब्रिगेडच्या प्रमुखावर हल्ला करण्यासाठी भाजपाने त्यांना खतपाणी घातले आहे असा स्पष्ट आरोप ब्रिगेडने केला आहे.

१३ जुलै रोजी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड हे अक्कलकोट येथे फत्तेसिंह शिक्षण संस्था व सकल मराठा समाज यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी गेले होते. कमला राजे चौकात त्यांची गाडी पोचताच तिथे शिवधर्म संघटनेचे काही कार्यकर्ते त्यांची वाट पाहात होते. त्यांच्या ताफ्यावर शिवधर्म संघटनेच्या कार्यकर्त्यांनी हल्ला बोल केला. प्रवीण गायकवाड यांना मोटारीतून खेचून बाहेर काढले व त्यांच्यावर शाई ओतून संताप व्यक्त केला.

प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाईफेकीच्या घटनेनंतर महाराष्ट्रात अनेक शहरात व गावागावांतून संभाजी ब्रिगेडचे लोक रस्त्यावर उतरले व त्यांनी महायुती सरकारचा धिक्कार केला. भाजपाने महाराष्ट्रात सत्ता मिळविण्यासाठी ठाकरे यांची शिवसेना व शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस असे दोन राजकीय पक्ष फोडले, आता संभाजी ब्रिगेड व बामसेफ या संघटनांना संपविण्याचे कारस्थान भाजपाने रचले आहे, असा आरोप संभाजी बिग्रेडने उघडपणे केला आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करणाऱ्यांवर जनसुरक्षा कायद्यानुसार कारवाई करणार का? असा प्रश्न याच संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे. संभाजी ब्रिगेडने आपली लढाई केवळ शिवधर्म संघटनेच्याच विरोधात नव्हे तर सत्तेवर असलेल्या भाजपाच्या विरोधात पुकारली आहे.

विशेष म्हणजे राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन मुंबईत चालू असतानाच प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झाल्याने त्याचे पडसाद अधिवेशनाताही उमटले व भाजपाने या हल्ल्याच्या घटनेनंतर संभाजी ब्रिगेडला आपल्या अंगावर ओढवून घेतले आहे.

मुख्य आरोपी दीपक काटे हा राज्याचे मंत्री व भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जवळचा म्हणून ओळखला जातो. अक्कलकोटमधील घटनेनंतर दीपक काटे याचे बावनकुळे यांच्याबरोबरचे काही फोटोही सोशल मिडियावर व्हायरल झाले.

या सर्व घटनेनंतर महायुती सरकारला व भाजपाला बचावात्मक भूमिका घ्यावी लागली आहे. हल्ला करणाऱ्या सर्व आरोपींना पोलिसांनी तत्काळ अटक केली आहे असे मुख्यमंत्र्यांना वारंवार सांगावे लागले. गुन्हेगाराला पक्ष, जात, पात, धर्म नसतो, तो गुन्हेगारच असतो, आम्ही त्या हल्ल्याचा निषेध करतो असे पक्षाचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी म्हटले आहे. दीपक काटे याच्यावर पोलिसांनी जे गुन्हे दाखल केले, त्यानंतर तो चार दिवसातच जामीनावर बाहेर आला.

संभाजी ब्रिगेड ही महाराष्ट्रात एक आक्रमक संघटना म्हणून ओळखली जाते, या संघटनेने आता प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा बदला घेण्याची घोषणा केल्यामुळे राज्यात काहीसे असुरक्षिततेचे वातावरण आहे.

**इंडिया कॉलिंग**
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

संभाजी बिग्रेडच्या प्रदेशाध्यक्षांना काळे फासल्यामुळे या संघटनेचे मराठा समाजातील तरूण कार्यकर्ते संतप्त झाले आहेत. या घटननंतर राज्यात पंधरा वीस ठिकाणी तरी संभाजी ब्रिगेडने रस्त्यावर येऊन संताप प्रकट केलाय. हल्लेखोर दीपक काटे याला भाजपा सरकार वाचविण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोपही संभाजी ब्रिगेडने केला आहे.

संभाजी ब्रिगेड या नावाच्या मागे छत्रपती असा उल्लेख नाही, हाच आपला प्रमुख आक्षेप असल्याचे शिवधर्म संघटना सांगत आहे. संभाजी महाराजांचा संभाजी ब्रिगेडकडून अवमान केला जातो आहे असे काटे व त्यांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. पण या एकाच कारणावरून प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकण्यात आली का?

एका हत्येच्या आरोपावरून यापुर्वी काटे याच्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. काटे हा पुण्याच्या येरवडा जेलमधे सात वर्षे होता. याच वर्षी जानेवारी महिन्यात काटे हा हैदराबादला निघाला असताना पोलिसांनी पुणे विमानतळावर त्याला अटक केली व त्याच्याकडे २८ जिवंत काडतुसे व बॅगेत पिस्तुल मिळाले. अशा गुन्हेगाराला भाजपा कसे काय जवळ करू शकतो असा प्रश्न विचारला जात आहे.

५ जानेवारी २००४ रोजी संभाजी ब्रिगेडने पुण्याच्या भांडारकर प्राच्य संशोधन संस्थेवर हल्ला करून मोठी मोडतोड केली होती. तिथली पुस्तके, संशोधन ग्रंथ, जुने ऐतिहासिक संदर्भ यांची मोठी नासधूस केली होती.

अमेरिकन लेखक जेम्स लेनने हिंदू किंग इन इस्लामिक इंडिया या पुस्तकात आक्षेपार्ह मजकूर लिहिला होता, व त्याची माहिती या संस्थेतून त्याने घेतली असा ब्रिगेडचा आरोप होता. तेव्हा केंद्रात अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली एनडीएचे सरकार होते व राज्यात काँग्रेस- राष्ट्रवादी काँग्रेसचे आघाडी सरकार होते.

भांडारकर इंस्टिट्यूटवर झालेल्या हल्ल्याने संभाजी ब्रिगेडने सर्व देशाचे लक्ष वेधून घेतले होते. या घटनेत पोलिसांनी ७२ जणांवर गुन्हे दाखल केले होते. १४ वर्षांनी न्यायालयाचा निकाल लागला. पुराव्या अभावी ६८ जणांची निर्दोष मुक्तता झाली. मधल्या काळात चार आरोपींचे निधन झाले.

नाशिक येथे झालेल्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनात मुंबईतील एका मोठ्या मराठी वृत्तपत्राच्या संपादकावर संभाजी ब्रिगेडने शाई फेकली होती. त्या संपादकाने लिहिलेल्या पुस्तकात संभाजी महाराजांची बदनामी केल्याचा आरोप ब्रिगेडने केला होता.

दादोजी कोंडदेव हे छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू नाहीत ही संभाजी ब्रिगेडची भूमिका होती. राज्य शासनाच्यावतीने दिला जाणारा त्यांच्या नावाचा पुरस्कार रद्द करावा तसेच क्रमिक पुस्तकातील त्यांचा उल्लेख काढून टाकावा यासाठी संभाजी ब्रिगेडने आंदोलन केले होते. सरकारने दादोजी कोंडदेव यांच्या नावाचा पुरस्कार रद्द केला व नंतर पुस्तकातील धडाही वगळला.

२०१० मधे पुण्याच्या लाल महालातून संभाजी ब्रिगेडने दादाजी कोंडदेव यांचा पुतळा उखडला व फेकून दिला. २०१२ मधे रायगडावरील वाघ्या कुत्र्याची समाधी फोडून कुत्र्याचा पुतळाही दरीत फेकून दिला. २०१७ मधे पुण्याच्या संभाजी उद्यानातून लेखक कवि राम गणेश गडकरी यांचा पुतळाही संभाजी ब्रिगेडने हटवला. गडकरी यांनी त्यांच्या नाटकातून संभाजी महाराजांची बदनामी केली आहे असा ब्रिगेडचा आक्षेप होता.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास लिहून ज्यांनी मराठी लोकांच्या घराघरात पोचवला त्या शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यासही संभाजी ब्रिगेडने विरोध केला होता. तरीही तत्कालीन भाजपा सरकारने महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मान केला.

अक्कलकोट येथे प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या शाई फेक घटनेनंतर स्वतः गायकवाड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप) चे प्रमुख शरद पवार यांची भेट घेतली. संभाजी ब्रिगेड व राष्ट्रवादी काँग्रेसने मंत्री बावनकुळे यांच्यावरच कारवाई करावी अशी मागणी केली आहे. शिवाय जशास तसे बदला घेण्याची धमकी दिली आहे. राज्यातील महायुती सरकारला यामुळे नवीन डोकेदुखी निर्माण झाली आहे.

# हुकुमशाही विरोधात जनता रस्त्यावर

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सत्तेवर येऊन जेमतेम सहा महिने झाले. या सहा महिन्यातच अमेरिकन जनता त्यांना वैतागली असल्याचे दिसून येत आहे. ज्या अमेरिकन जनतेने सहा महिन्यापूर्वी डोनाल्ड ट्रम्प यांना भरभरून मते देऊन राष्ट्राध्यक्ष बनवले तीच अमेरिकन जनता आता त्यांच्या विरुद्ध रस्त्यांवर उतरून आंदोलने करीत आहे.**

--------------

विशेष म्हणजे ही आंदोलने फक्त एका शहरात किंवा राज्यात होत आहेत असे नाही तर अमेरिकेतील सर्व शहरात होत आहेत आणि त्यात लाखो अमेरिकन नागरिक सहभागी होत आहेत. नुकतेच स्थलांतरितांना हद्दपार करणे आणि गरिबांसाठी मेडिकेम सुविधा कमी करणे याविरोधात १६०० हून अधिक ठिकाणी अमेरिकन नागरिकांनी निदर्शने केली.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

आंदोलकांनी या आंदोलनाला गुड ट्रबल लाईव्हज ऑन असे नाव दिले. शिकागो हे या आंदोलनांचे मुख्य केंद्र होते. या आंदोलनात लाखो नागरिक रस्त्यावर जमले. सर्वांनी हातात मेणबत्ती घेऊन मोर्चा काढला. हे आंदोलन शांततेत पार पडले तरी या आंदोलनात आंदोलकांनी ट्रम्प यांच्या विरोधात रोष व्यक्त केला.

पब्लिक सिटिझन ग्रुपच्या सह - अध्यक्षा लिसा गिल्बर्ट यांनी सांगितले की आपण आपल्या देशाच्या इतिहासातील भयानक काळातून जात आहोत. सरकारमध्ये वाढत्या हुकूमशाही वृत्तीचा आणि कायद्याच्या उल्लंघनाचा सामना करत आहोत, जो आपल्या लोकशाही स्वातंत्र्याला आणि अधिकारांना आव्हान देत आहे. या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध हे आंदोलन आहे. अर्थात ट्रम्प यांच्या हुकुमशाही प्रवृत्तीविरुद्ध अमेरिकन नागरिकांनी केलेले हे पहिलेच आंदोलन नाही.

मागील महिन्यातच अमेरिकन नागरिकांनी असेच एक मोठे आंदोलन केले होते. आंदोलकांनी त्या आंदोलनाला 'हॅण्डस ऑफ' आंदोलन असे नाव दिले होते. ते आंदोलन लोकशाहीसाठी असल्याचे सांगितले गेले.

त्या आंदोलनात अमेरिकेतील दीडशे पेक्षा जास्त गटांनी सहभाग घेतला होता. त्यात सामाजिक हक्क संघटना, कामगार संघटना, एलजीबिटीक्यू प्लस समर्थक गट, सामाजिक आणि लोकशाहीवादी गटांचा समावेश आहे.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधातील ते आंदोलनही शांततेत पार पडल्याने कोणालाही अटक करण्यात आली नव्हती मात्र त्या आंदोलनामुळे अमेरिका आणि डोनाल्ड ट्रम्प यांची जगभर अप्रतिष्ठा झाली होती. आताही तेच झाले. सह महिन्यांपूर्वी ज्या डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेने सत्तेवर बसवले त्यांच्याच विरोधात जनतेला रस्त्यांवर का उतरावे लागत आहे असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर आहे ट्रम्प यांचा एककल्ली आणि मनमानी कारभार.

राष्ट्राध्यक्ष पदाची शपथ घेतल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी निर्णयांचा धडाका लावला आहे पण हे निर्णय घेताना त्यांनी अनेकांना दुखावले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी इतर देशातून आयात होणाऱ्या मालांवर भरमसाठ कर लावला आहे. हे करताना त्यांनी अमेरिकेचेच भले होणार असे जनतेला ठासून सांगितले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या या निर्णयाला मेक्सिको, चीन, भारत, कॅनडा या देशांनीही जशास तसे उत्तर देऊन अमेरिकेतून आयात होणाऱ्या मालांवर तितकाच अतिरिक्त कर लावला आहे त्यामुळे जगात व्यापार युद्धाला तोंड फुटले आहे याचा परिणाम जितका जगावर होणार आहे तितकाच तो अमेरिकेवर देखील होणार आहे.

या व्यापार युद्धामुळे अमेरिकन बाजारपेठेत मंदी येण्याची भीती तेथील तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. जर अमेरिकेत मंदी आली तर अमेरिकेत महागाई वाढेल त्याचा फटका तेथील सर्वसामान्य नागरिकांनच बसेल त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांचा हा निर्णय तेथील सर्वसामान्य लोकांना पटलेला नाही. केवळ हा एकमेव निर्णय नाही तर गेल्या काही दिवसात ट्रम्प यांनी घेतलेले अनेक निर्णय जनतेच्या पचनी पडले नाहीत.

त्यात हजारो केंद्रीय कर्मचाऱ्यांची कपात, सामाजिक सुरक्षा व्यवस्थापन कार्यालये बंद करणे, मदत एजेंसी बंद करणे, स्थलांतरितांना हद्दपार करणे, तृतीय पंथीयांच्या कामाच्या संधी कमी करणे, आरोग्य कार्यक्रमांच्या निधीमध्ये कमी करणे हे आणि यासारखे अनेक निर्णय अमेरिकेतील जनतेला पटले नाहीत . या निर्णयांना विरोध करण्यासाठीच अमेरिकन जनता रस्त्यावर उतरत आहे.

जनतेचा वाढता रोष कमी करण्यासाठी व्हाईट हाऊस पुढे सरसावली आहे मात्र त्याचा आंदोलकांवर कोणताही परिणाम होताना दिसत नाही. आंदोलनाची धग वाढतच चालली आहे. हे आंदोलन जर असेच चालू राहिले तर डोनाल्ड ट्रम्प यांना जनतेपुढे झुकावेच लागेल आणि आपल्या एककल्ली स्वभावाला मुरड घालून जनतेच्या हिताचे असे सर्वसमावेशक निर्णय घ्यावे लागेल.

■ ■ ■

# ममतांची आदळआपट कशासाठी?

पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या सध्या आंदोलनाच्या मूडमध्ये आहेत. २०११ मध्ये ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीला विधानसभा निवडणुकीत पराभूत करुन, डाव्या आघाडीची ३४ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली. त्यानंतर गेली १४ वर्षे, ममता बॅनर्जी या पश्चिम बंगाल मध्ये अव्याहतपणे राज्य करत आहेत.



१९७७ ते २०११ अशी ३४ वर्षे पश्चिम बंगालवर राज्य करणाऱ्या मार्क्सवादी कम्युनिस्ट प्रणीत डाव्या आघाडीला, ममतांनी जवळ जवळ संपुष्टात आणले आहे. डाव्या आघाडीची पश्चिम बंगालमधील ही घसरण, राजकीय पंडितानाही आश्चर्यचकित करणारी आहे.

२०२१ मध्ये झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला विधानसभेची एकही जागा जिंकता आली नाही. २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत पश्चिम बंगाल मध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची पाटी कोरी राहिली. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची, पश्चिम बंगालमध्ये ही अधोगती होत असताना, भाजपाने राज्यात आपले पाय भक्कमपणे रोवले आहेत.



अभय गोखले

भाजपाचा पुर्वावतार असलेल्या जनसंघाचे संस्थापक डॉ.शामाप्रसाद मुखर्जी हे बंगाली होते, तरीही जनसंघाला आणि नंतर भाजपाला पश्चिम बंगालमध्ये बरीच वर्षे आपले पाय रोवता आले नव्हते.

२०१४ मध्ये भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकार केंद्रात सत्तेवर आल्यानंतर पश्चिम बंगालमधील भाजपाची स्थिती हळूहळू सुधारु लागली. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या दोन जागा जिंकून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला.परंतु भाजपाची घोडदौड तिथेच थांबली नाही.

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या एकूण ४२ जागांपैकी १८ जागा जिंकून सत्ताधारी तृणमूलला तोडीसतोड लढत दिली. त्या निवडणुकीत भाजपा आणि तृणमूलला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीत फारसा फरक नव्हता. २०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळाले नाही.

मात्र विधानसभेच्या ७७ जागा जिंकून भाजपाने, तृणमूल काँग्रेसला चांगली लढत दिली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाची कामगिरी पुर्वीसारखी चांगली झाली नाही. त्या निवडणुकीत भाजपाने पश्चिम बंगाल मधील लोकसभेच्या १२ जागा जिंकल्या.या पार्श्वभूमीवर पुढील वर्षी पश्चिम बंगाल मध्ये विधानसभेच्या निवडणुका होत आहेत.

लेखात वर म्हटल्याप्रमाणे, ममता बॅनर्जी या सध्या आंदोलनाच्या मूडमध्ये आहेत. त्याला कारण अर्थातच भाजपा हीच आहे. गेली १४ वर्षे पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असूनही, ममता बॅनर्जी या अधूनमधून विरोधीपक्ष नेत्याच्या भूमिकेत वावरत असतात.

डावी आघाडी पश्चिम बंगाल मध्ये सत्तेवर असताना,ममता बॅनर्जी या विरोधी पक्ष नेत्या होत्या.तेंव्हा त्या उठसूठ मोर्चे काढत असत,बंद पुकारत असत, धरणे धरत असत, उपोषणाला बसत असत. आता राज्याच्या मुख्यमंत्री होऊन १४ वर्षे उलटल्यानंतरही, आपण आता विरोधी पक्ष नेत्या नाही, ही गोष्ट त्यांच्या लक्षात रहात नाही.

भाजपाशासीत काही राज्यांमध्ये पश्चिम बंगाल मधील नागरिकांना, बांगलादेशी नागरिक ठरवून,त्यांचा जो छळ केला जात आहे,(असा ममतांचा आरोप आहे) त्या विरोधात ममतांनी कोलकात्यामध्ये नुकताच एक निषेध मोर्चा काढला होता. त्यावेळी त्यांनी अतिशय आक्रमक भाषण केले.

त्या म्हणाल्या की देशातील इतर राज्यांत सुमारे २२ लाख बंगाली काम करत आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड, इलेक्शन कार्ड इत्यादी ओळखपत्रे आहेत. तरी सुध्दा, महाराष्ट्र, ओडिशा, गुजरात, आसाम दिल्ली इत्यादी भाजपाशासीत राज्यांत ते बांगलादेशी असल्याचा संशय व्यक्त करुन, त्यातील काही जणांना ताब्यात घेतले जात आहे.

त्यांना अटक केली जात आहे. त्यांना स्थानबद्धता छावणीत पाठवले जात आहे. काही जणांना तर, त्यांनी ओळखपत्रे सादर केल्यानंतरही, बांगलादेशी नागरिक ठरवण्यात आले आणि त्यांना बांगलादेशमध्ये ढकलण्यात आले. हे सर्व ठरवून करण्यात येत असल्याचा आरोप ममतांनी केला आहे.

ममतांच्या आरोपात काही प्रमाणात तथ्य असले तरी, ममतांनी भाजपाशासीत राज्यांवर केलेला आरोप पुर्णपणे खरा नाही. भाजपाशासीत काही राज्यांमध्ये जे अवैध बांगलादेशी नागरिक पकडले गेले, त्यांची व्यवस्थितपणे छाननी करण्यात आली होती. आधार कार्ड, इलेक्शन कार्ड ही ओळखपत्रे, ममता म्हणतात त्याप्रमाणे सरसकट पुरावा मानता येणार नाहीत.

पश्चिम बंगालमध्ये बनावट ओळखपत्रे मिळवून देणारे अनेक एजंट आहेत. त्यामध्ये तृणमूल काँग्रेसचे बरेच कार्यकर्ते आहेत. बांगलादेशी घुसखोर हे तृणमूल काँग्रेसची व्होट बँक असल्याने, बांगलादेशी घुसखोरांना आधार कार्ड, इलेक्शन कार्ड अवैधरित्या मिळवून देण्यात, तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते आघाडीवर असतात. ही ओळखपत्रे मिळाल्यानंतर, बांगलादेशी घुसखोर हे भारतातील इतर राज्यांत प्रवेश करतात आणि तेथे कामधंदा मिळवतात.

भाजपाशासीत काही राज्यांत बंगाली नागरिकांचा जो तथाकथित छळ होत आहे, त्याबद्दल ममतांना काही पडलेली नाही. खरी गोष्ट अशी आहे की, त्याचे राजकारण करुन, ममतांना त्याचा फायदा पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत उठवायचा आहे. बंगाली अस्मिता वगैरे गोष्टी या फक्त दिखावा आहेत. प. बंगाल मधील मुस्लिम समाज ही त्यांची व्होट बँक आहे आणि त्यांना खूष ठेवण्यासाठी त्या कोणत्याही थराला जातील.

एखादा माणूस बंगाली भाषा बोलतो म्हणून त्याला बांगलादेशी नागरिक ठरवले जात नाही, ही गोष्ट ममतांना चांगल्याप्रकारे ठाऊक आहे, परंतु बंगाली भाषिकांवर, भाजपाशासीत काही राज्यांमध्ये अन्याय केला जात आहे, अशी आवई उठवून, ममता, बंगाली अस्मिता जागृत करत आहेत.

पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत ममता याच मुद्यावर प्रामुख्याने जोर देण्याची शक्यता आहे. भाजपा ही हिंदी भाषीक पट्ट्यातील पार्टी असल्याचा प्रचार, तृणमूल काँग्रेसकडून नेहमी केला जातो. भाजपाला ते आऊटसाईडर म्हणून संबोधतात.

आता त्याचा प्रतिवाद भाजपाकडून कसा केला जातो, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. ममतांनी सांगितले आहे की,त्या आता जास्तीतजास्त बंगाली भाषेत बोलणार आहेत. मला अटक करून दाखवा असे आव्हान त्यांनी भाजपाला दिले आहे.

मतदार याद्यांच्या छाननीत असंख्य अवैध बांगलादेशी नागरिकांची नावे मतदार यादीतून वगळण्यात येणार आहेत आणि ही ममतांची व्होट बँक असल्याने,त्या सैरभैर झाल्या आहेत व त्यातून आलेल्या नैराश्यामुळे त्या आदळआपट करत आहेत.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

■ ■ ■

# इन्कमटॅक्स अधिकारी यांना अरेस्ट करण्याचे अधिकार आहेत का?

गेल्या अनेक आठवड्यापासून आपण इन्कमटॅक्स अभ्यासामध्ये सोन्याबद्दलची माहितीचा अभ्यास करत होतो. आज आपण नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात नवीन माहिती जाणून घेणार आहोत.

**प्रश्न** – इन्कमटॅक्सचे वरिष्ठ अधिकारी यांना अरेस्ट करण्याचे अधिकार आहेत का?

■ सहसा सामान्य लोकांमध्ये असा प्रश्न नेहमी चर्चिला जातो की, इन्कमटॅक्सचे अधिकारी यांना जर करदात्याची काही चुक सापडली तर त्यास ह्यअरेस्टह्ण करून घेऊन जाऊ शकतात का? सहसा, इन्कमटॅक्स अधिकारी यांना अरेस्ट करण्याचे प्रत्यक्ष अधिकार नाही. त्यांना प्रत्यक्ष अरेस्टचे अधिकार नसल्यामुळे त्यांना करदात्यास अरेस्ट करता येत नाही.

**सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट**
**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना.**




**प्रश्न** – अज्ञानराव या करदात्याच्या घरात ज्ञानदेवराव या इन्कमटॅक्स अधिकाऱ्यास खूप बेहिशेबी सोनं सापडल्यास कारवाई करू शकता का?

■ वरील प्रश्न पहिल्यांदा आपण सोप्याभाषेत समजून घेऊया की अज्ञानराव हे एक अशिक्षित आहेत. परंतु, त्यांच्याकडे बेहिशेबी खूप जास्त सोनं ज्ञानदेवराव या इन्कमटॅक्स अधिकाऱ्यास धाडीत सापडले आहे. अशा वेळेस ज्ञानदेवराव हे या बेहिशेबी सोन्याची कारवाई करू शकतात का ? याचे उत्तर आहे की इन्कमटॅक्स अधिकारी ज्ञानदेवराव हे अज्ञानराव या करदात्यावर नक्कीच कारवाई करू शकतात. कारवाई करणे हे त्यांचे प्राथमिक अधिकार आहेत.

**प्रश्न** – इन्कमटॅक्स अधिकारी ज्ञानदेवराव हे करदाते अज्ञानराव यांच्यावर सहसा किती प्रकारची कारवाई करु शकतात?

■ सहसा, अशा प्रसंगी इन्कमटॅक्स अधिकारी दोन प्रकाराची कारवाई करू शकतात पहिली कागदी ऑफिशियल कारवाई आणि दुसरी पोलीस कारवाई.

**प्रश्न** – ऑफिशियल कार्यवाही म्हणजे नेमकी काय कारवाई करणार ?

■ ऑफिशियल कार्यवाही म्हणजे सर्वात आधी ज्ञानदेवराव हे अज्ञानराव या करदात्याची धाडीत सापडलेली सोन्याची ज्वेलरी वगैरे जप्त करू शकतात. ते जप्त करण्याची ऑफिशियल रीतसर कार्यवाही करू शकतात.

**प्रश्न** – इन्कमटॅक्स अधिकारी पोलीस कार्यवाही करू शकतात, म्हणजे ते करदात्यास अरेस्ट करू शकतात का ?

■ आपण सुरुवातीस बघितले की, सहसा इन्कमटॅक्स अधिकारी करदात्यास अरेस्ट करत नाहीत. परंतु, जर इन्कमटॅक्स अधिकारी ज्ञानदेवराव यांच्याकडे असा सबळ पुरावा आहे की सापडलेला गुन्हा सिरीयस नेचरचा आहे, हे क्रिमिनल प्रोसिडिंगमध्ये पूर्णतः फिट केस आहे. त्यांच्याकडे या गुन्ह्याचे पूर्णतः पुरावे आहेत. अज्ञानराव या पुराव्यांना नष्ट करू शकतात किंवा भारत सोडून बाहेर देशात पळून जाऊ शकतात, अशा वेळेस अपवादप्रसंगी इन्कमटॅक्स अधिकारी यांना अरेस्ट (वरिष्ठांच्या परवानगीने) करूही शकतात.

पुढील लेखमालेत आपण बघणार आहोत की, सर्व्हे सर्च आणि सीझर म्हणजे काय तसेच राजस्थान हायकोटार्ने कधी सांगितले की इन्कमटॅक्सअधिकाऱ्याने स्वतःचे डोके (Application of mind) वापरले पाहिजे.

ज्या वाचकांच्या काही सुचना किंवा प्रश्न असतील त्यांनी 9422218428 या वर फक्त व्हॉट्सॲप मेसेज करावे, त्या प्रश्नांची उत्तरे याच पेपरच्या पुढील लेखमालेत विनामुल्य दिली जाईल, ही नम्र सुचना.

■ ■ ■

# किवी दूर करेल बद्धकोष्ठतेची समस्या



बद्धकोष्ठता ही एक मोठी समस्या आहे. हा आजार असा आहे की लोक नेहमीच काळजीत असतात. किवी या सर्वांवर एक इलाज आहे. अमेरिकेतील शीर्ष डॉक्टर म्हणतात की किवी खाल्ल्याने सर्वात जुनाट बद्धकोष्ठता देखील दूर होऊ शकते. किवी हे केसाळ फळ आहे ज्यामध्ये भरपूर पोषक तत्वे असतात. ते पचनासाठी एक उत्तम अन्न आहे.

किवी खाल्ल्याने बद्धकोष्ठता आणि इरिटेबल बोवेल सिंड्रोम सारख्या सामान्य समस्यांपासून आराम मिळतो. किवीमध्ये असलेले फायबर, अँटीऑक्सिडंट्स आणि विशेष एंजाइम पचन सुधारण्यास आणि आतडे संतुलित ठेवण्यास मदत करतात. दिवसातून फक्त दोन किवी खाल्ल्याने आतड्यांचे नियमितीकरण होते आणि बद्धकोष्ठतेची लक्षणे सुधारतात.

किवीमध्ये फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि एन्झाईम्सचे अनोखे मिश्रण ते पचन आरोग्यासाठी एक सौम्य आणि प्रभावी पर्याय बनवते. किवीमध्ये फायबर, ॲक्टिनिडिन आणि पॉलीफेनॉल सारखी नैसर्गिक संयुगे असतात.

किवीमध्ये विरघळणारे आणि अघुलनशील दोन्ही प्रकारचे फायबर असते, जे मल नियंत्रित करण्यास आणि आतड्यांमध्ये चांगले बॅक्टेरिया वाढविण्यास मदत करते. किवीमध्ये असलेले ॲक्टिनिडिन हे एक विशेष प्रकारचे एंजाइम आहे जे प्रथिने तोडण्यास मदत करते आणि पचनास मदत करते.

किवीमध्ये फ्लेव्होनॉइड्स आणि फेनोलिक एसिडसारखे पॉलीफेनॉल देखील असतात, ज्यामध्ये दाहक-विरोधी गुणधर्म असतात. किवीमध्ये प्रीबायोटिक फायबर असते, जे चांगल्या बॅक्टेरियाची वाढ वाढवते आणि आतड्यांचे आरोग्य सुधारते.

तुम्ही किवी कच्चे देखील खाऊ शकता. किवीचे तुकडे करून ते नाश्त्यात खाऊ शकता किंवा फळांच्या सॅलड, स्मूदी किंवा ओटमीलमध्ये घालू शकता. तुम्ही किवी रेसिपी देखील बनवू शकता. किवीची चव लिंबूवर्गीय फळे आणि हिरव्या पालेभाज्यांसह चांगली जाते. तुम्ही किवीचा रस देखील बनवू शकता. किवीच्या रसातून तुम्हाला फायबर आणि ॲक्टिनिडिनचा नियमित डोस मिळू शकतो. किवीचे नियमित सेवन पचनसंस्था मजबूत करते आणि शरीराला हलके आणि सक्रिय वाटते.

■ ■ ■

**अशोकायन**
**प्रा. अशोक सारडा**
मेहकर
(९४२१३९४३३९)



## अंधेर नगरी

**शेतकरी शेतमजूर**
**अतिवृष्टीने त्रस्त**
**शासन मात्र सत्तेच्या**
**कलगीतुऱ्यात व्यस्त ..**

**निसर्गाचे डोळे वटारणे**
**मार्केटात बोगस बियाणे**
**शासनाचे उदासिन धोरण**
**शेतकऱ्याचे व्यर्थ जीवन ..**

**निसर्गाच्या लहरीपायी**
**बळी राजा खातो हाय**
**तोंडमिळवणी करतांना**
**जीव निघून जाय ..**

# शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरमधील डॉक्टरांनी मानेला गंभीर दुखापत झालेल्या रुग्णाचे प्राण वाचवले



**नागपूर, १९ जुलै :** अलीकडील एका उल्लेखनीय वैद्यकीय यशात, १०२० बेडच्या शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, वानाडोंगरी, नागपूर येथील डॉक्टरांनी आणि त्यांच्या टीमने अपघातात मानेला गंभीर दुखापत झालेल्या ४३ वर्षीय पुरुष रुग्णाचे प्राण वाचवून उत्कृष्ट वैद्यकीय कौशल्य आणि टीमवर्कचे उत्तम उदाहरण सादर केले.

रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या या रुग्णाला सुरुवातीला दुसऱ्या रुग्णालयात नेण्यात आले होते. मात्र प्रकृती गंभीर झाल्याने त्याला तातडीने शालिनीताई मेघे हॉस्पिटल मध्ये पाठविण्यात आले. तो पहाटेच्या सुमारास आपत्कालीन विभागात दाखल झाला, त्याच्या मानेवर डाव्या बाजूला खोल कापलेली जखम होती, मोठ्या प्रमाणात रक्तस्राव होत होता आणि शरीरात रक्ताच्या कमतरतेमुळे त्याला हायपोव्होलेमिक शॉकची लक्षणे दिसत होती. त्याचे नाडीचे ठोके १२२ प्रति मिनिट, रक्तदाब ५६/३४ मिमीएचजी होता आणि तो अर्धबेशुद्ध अवस्थेत होता. सतत रक्तस्राव सुरू होता, जखमेवर दाब देऊनही रक्तस्राव थांबत नव्हता.

परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन, ऑन-कॉल सर्जिकल टीमला ताबडतोब सक्रिय करण्यात आले. प्राथमिक उपचार आणि रक्तदाब स्थिर केल्यानंतर रुग्णाला पहाटे ३:३० च्या सुमारास ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान डाव्या बाजूचा बाह्य जुग्युलर व्हेन पूर्ण तुटलेला आढळला, (स्टर्नोक्लेडोमास्टॉइड) मानेच्या एका मोठ्या स्नायूमध्ये जखम झाली होती आणि डाव्या ब्रॅकिओसेफॅलिक व्हेनच्या एका उपशाखेलाही दुखापत झाली होती. शस्त्रक्रियेदरम्यान तातडीने रक्तस्राव थांबवून सर्व जखमी झालेल्या भागावर यशस्वी उपचार करण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान रक्त चढवण्यात आले, ज्यामुळे रुग्णाची प्रकृती स्थिर करण्यात मदत झाली.

या रुग्णावर एक समर्पित आणि अनुभवी डॉक्टरांच्या टीमने उपचार केले. या टीममध्ये डॉ. प्रविण निखाडे (प्रोफेसर), डॉ. सूरज कगवड व डॉ. दानिश अनीस (असिस्टेंट प्रोफ़ेसर), तसेच जूनियर रेजिडेंट डॉक्टर डॉ. गौरव, डॉ. सिमरन आणि डॉ. संदीप यांचा समावेश होता. ही संपूर्ण प्रक्रिया शस्त्रक्रिया विभागाचे विभागप्रमुख डॉ. राजीव सोनारकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. अनेस्थेशिया सेवा डॉ. रीता गुप्ता यांनी दिले आणि त्यासाठी डॉ. अंजली बोरकर (प्रमुख, अॅनेस्थेशिया विभाग) यांचे मार्गदर्शन लाभले. शस्त्रक्रियेनंतर आयसीयू मध्ये रुग्णाची काळजी डॉ. हेमंत देशपांडे, डॉ. राकेश भैसारे, डॉ. राहुल डागा, डॉ. अमित सुथार, डॉ. अनिताभ सुखदेवे, डॉ. मसूम बिरंजन आणि डॉ. समृद्धी तायडे यांनी घेतली. नर्सिंग टीमचे नेतृत्व सिस्टर गीता कुबडे (एएनएस) यांनी केले आणि त्यांच्यासोबत सिस्टर श्रुती, सिस्टर प्रितीका, सिस्टर ज्योती आणि सिस्टर पूजा यांचा समावेश होता. सर्व नर्सिंग टीमचे मार्गदर्शन डॉ. सीमा सिंग (नर्सिंग डायरेक्टर) यांनी केले.

शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. वसंत गावंडे यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर आहे आणि सातव्या दिवशी त्याला रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. सध्या तो बरा असून, नियमित फॉलोअप घेत आहे.

डीएमआयएचईआर (डीयू) ऑफ कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. अनुप मरार यांनी सांगितले, ही घटना शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरची आपत्कालीन सेवांमधील तत्परता, शस्त्रक्रियेमधील कौशल्य आणि समाजासाठी गुणवत्तापूर्ण व परवडणारी आरोग्यसेवा देण्याच्या बांधिलकीचे उत्तम उदाहरण आहे.

रुग्णाच्या कुटुंबियांनी तात्काळ आणि जीव वाचवणाऱ्या उपचाराबद्दल संपूर्ण वैद्यकीय टीमचे आणि शालिनीताई मेघे हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे मनःपूर्वक आभार मानले.

# मॅक्स हॉस्पिटल, नागपूर तर्फे शिफा क्लिनिक, चंद्रपूर येथे स्पाईन आणि कॅन्सर उपचारासाठी खास ओपीडी सेवा सुरू



**चंद्रपूर, १९ जुलै :** मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर यांनी आज डॉ. रझिक शेख यांच्या शिफा क्लिनिकच्या सहकार्याने स्पाईन सर्जरी आणि कॅन्सर उपचारासाठी खास ओपीडी सेवा सुरू केल्याची घोषणा केली. या ओपीडी सेवांचा शुभारंभ मॅक्स हॉस्पिटलचे स्पाईन सर्जन डॉ. परेश बंग आणि ऑन्को सर्जन डॉ. कवाडू जवाडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. हे दोन्ही तज्ज्ञ डॉक्टर दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सकाळी ११:०० ते दुपारी २:०० या वेळेत उपलब्ध राहतील.

या ओपीडी सेवांच्या माध्यमातून मॅक्स हॉस्पिटलचा उद्देश म्हणजे चंद्रपूर आणि आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना त्यांच्या घराजवळच उच्च दर्जाच्या, अत्याधुनिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, जेणेकरून रुग्णांना वेळेत आणि प्रभावी उपचार मिळू शकतील.

डॉ. परेश बंग, कन्सल्टंट - स्पाईन सर्जन, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर यांनी सांगितले, अनेक वेळा पाठीच्या मणक्याशी संबंधित समस्या दुर्लक्षित केल्या जातात, जोपर्यंत त्या आयुष्यावर गंभीर परिणाम करत नाहीत. या ओपीडी सेवेच्या माध्यमातून आम्ही चंद्रपूरमध्ये आमच्या स्पाईन सर्जरी सेवांचा विस्तार करीत आहोत, जेणेकरून या भागातील लोकांना तज्ज्ञ उपचार जवळच मिळू शकतील. आम्ही कमी चीरफाड होणाऱ्या (मिनिमली इनवेसिव्ह) शस्त्रक्रिया पद्धती वापरतो, ज्यामुळे रुग्णांना कमी त्रास होतो आणि ते लवकर बरे होतात.

डॉ. कवाडू जवाडे, कन्सल्टंट - ऑन्को सर्जन, मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर यांनी सांगितले, कॅन्सरच्या उपचारासाठी वेळेवर सल्ला घेणे आणि विविध तज्ज्ञांचा एकत्रित दृष्टिकोन असणे खूप महत्त्वाचे असते, जेणेकरून रुग्णाला सर्वोत्तम परिणाम मिळू शकतील. या नवीन कॅन्सर ओपीडीच्या माध्यमातून आम्ही अधिक रुग्णांना वेळेत निदान, तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य उपचार योजना आणि वैयक्तिक फॉलो-अप सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. यामुळे रुग्णांना लांब प्रवास न करता स्थानिक पातळीवरच दर्जेदार उपचार मिळू शकतात. ही सेवा रुग्णांच्या घराजवळच संपूर्ण कॅन्सर उपचार सुविधा उपलब्ध करून देते, जेणेकरून रुग्णाला योग्य सल्ला योग्य वेळी मिळू शकेल. अत्याधुनिक रोबोटिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आमच्या शस्त्रक्रिया अधिक अचूक होतात, आणि त्यामुळे रुग्णांचे परिणामही अधिक चांगले होतात. या आधुनिक पद्धती रुग्णाच्या सोयीसाठी तयार करण्यात आलेल्या आहेत, ज्यामुळे शस्त्रक्रियेनंतरचा त्रास कमी होतो, रुग्ण लवकर बरे होतो आणि एकूणच उपचाराचे परिणाम अधिक चांगले होतात.

मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर हे चंद्रपूर आणि आसपासच्या भागांतील लोकांना सहज उपलब्ध आरोग्य सेवा देण्यासाठी आणि आपल्या सेवा अधिक विस्तारण्यासाठी कटिबद्ध आहे.

# लीव्ह बोरिंग बीहाइण्ड: भारतात नवीन बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपे लाँच



**नागपूर, १९ जुलै :** आज भारतात न्यू बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपे लाँच करण्यात आली. बीएमडब्ल्यू ग्रुप प्लाण्ट चेन्नई येथे स्थानिक पातळीवर उत्पादित करण्यात आलेली सेकंड-जनरेशन बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपे देशामध्ये फक्त पेट्रोल पॉवरट्रेनमध्ये उपलब्ध असेल. ही कार सर्व बीएमडब्ल्यू इंडिया डिलरशिप्समध्ये बुक करता येऊ शकते आणि डिलिव्हरीजना आजपासून सुरूवात होईल.

बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपेने आकर्षक डिझाइन आणि स्पोर्टी ड्रायव्हिंग क्षमतेसह आपला दर्जा स्थापित केला. ही कार क्षमतेसह स्टाइल आणि प्रीमियम कॉम्पॅक्ट सेगमेंटमध्ये ग्रॅन कूपे सिल्हूटचा शोध घेत असलेल्या शहरातील तरूण ग्राहकांमध्ये त्वरित लोकप्रिय ठरली.

विक्रम पावाह, प्रेसिडण्ट व सीईओ, बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे म्हणाले, न्यू बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपे प्रत्येक ठिकाणी स्पोर्टी सिल्हूट आणि आकर्षक डिझाइनसह सर्वांचे लक्ष वेधून घेते. लक्झरीअस अनुभव आणि वैशिष्ट्यांसह ही कार तुमच्या स्टाइलसाठी परिपूर्णपणे अनुकूल आहे. या कारमधून तिच्या ड्रायव्हरचे व्यक्तिमत्त्व दिसून येते, तसेच त्यामध्ये अधिक वाढ होते. न्यू जनरेशन बीएमडब्ल्यू २ सिरीज ग्रॅन कूपे स्टाइल व क्षमतेचा शोध घेत असलेल्या शहरातील तरूण ग्राहकांमध्ये लोकप्रिय ठरण्यास सज्ज आहे. या कारने समकालीन पैलूंना आव्हान देणे, अपेक्षांची पूर्तता करणे आणि अद्वितीय स्टाइलसह नेतृत्व करणे अशी सर्वोत्तम कामगिरी सुरू ठेवली आहे.''

*इन्वॉइसिंगच्या वेळी अस्तित्वात असलेली किंमत लागू होईल. एक्स-शोरूम किंमती जीएसटी सह (कम्पेन्सेशन सेससह) लागू होतील परंतु त्यात रोड टॅक्स, टॅक्स कलेक्टेड अॅट सोर्स (टीसीएस), टॅक्स कलेक्टेड अॅट सोर्सवर जीएसटी, आरटीओ स्टॅट्युअरी टॅक्स/फीज, इतर लोकल टॅक्स/सेस लेव्हीज आणि इन्शुरन्स या गोष्टी त्यातून वगळल्या जातील. किमती आणि पर्याय पूर्वसूचनेशिवाय बदलणे अपेक्षित आहे. अधिक माहितीसाठी कृपया स्थानिक अधिकृत बीएमडब्ल्यू डिलरशी संपर्क साधावा.

कार पुढील पेंटवर्क्समध्ये उपलब्ध आहे- ब्रूकलिन ग्रे मेटलिक, पोर्टिमाओ ब्ल्यू मेटलिक, ब्लॅक सफायर मेटलिक अँड अल्पाइन व्हाइट. आणि पुढील अपहोल्स्टरी पर्याय आहेत: वेगान्झा एस्प्रेसो ब्राऊन आणि वेगान्झा काम बीज. पुढील अपहोल्स्टरी पय्राय उपलब्ध आहेत - वेगान्झा पर्फोरेटेड 'मोचा' आणि वेगान्झा पर्फोरेटेड 'ऑयस्टर'.

सर्विस इनक्लुसिव्ह आणि सर्विस इनक्लुसिव्ह प्लस मालकीहक्काचा खर्च अधिक कमी करतात. ग्राहक कालावधी व मायलेजनुसार विविध सर्विस प्लॅन्समधून निवड करू शकतात. पॅकेजेसमध्ये कंडिशन बेस्ड सर्विस (सीबीएस आणि मेन्टेनन्स कामासह ३ वर्षे / ४०,००० किमी पासून सुरू होणाऱ्या योजनांचा समावेश आहे. हे पॅकेज जवळपास १० वर्षे / २,००,००० किमी पर्यंत वाढवता येऊ शकते. तसेच जवळपास १० वर्षांपर्यंत वॉरंटी प्रोग्राम विस्तारित करण्याचा पर्याय देखील उपलब्ध आहे.

# झी टीव्हीवर ड्रीमियत ड्रामाचा नवा शो 'गंगा माई की बेटियां' ज्यात शुभांगी लाटकर मुख्य भूमिका साकारणार



**मुंबई, १९ जुलै :** झी टीव्हीचा आगामी शो गंगा माई की बेटियां एक अशा महान, करुण आणि सशक्तिकरणाच्या प्रवासाची कहाणी सादर करतो, जिच्यावर समाजाने फार अन्याय केला आहे, पण तरीही ती स्त्री पुन्हा उभी राहण्यासाठी निर्धाराने सज्ज आहे. लोकप्रिय कन्नड शो पुट्टकाना मक्कळू वर आधारित या मालिकेत गंगा माईची कथा दाखवण्यात आली आहे अशी स्त्री जिला मुलगा नसल्यामुळे तिच्या पतीने टाकून दिले. विश्वासघात होऊनही ती डोके वर ठेवून जगणे पसंत करते. पालणपोषण करणारी आणि मार्गदर्शक अशी ही स्त्री, प्रेम, ताकद आणि अभिमानाने आपल्या तीन मुलींचा सांभाळ करते. झी टीव्हीच्या आपका अपना ज़ी टीवी ब्रँड वचनाचा भाग म्हणून हा शो वास्तवदर्शक आणि भावनिक सत्याचा उत्सव म्हणून सादर केला जातो आहे.

प्रसिद्ध अभिनेत्री शुभांगी लाटकर गंगा माईच्या प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. ही एक अशी स्त्री आहे, जिने औपचारिक शिक्षण घेतलेली नसली तरी ती अत्यंत हुशार आणि भावनाशील आहे. ती वाराणसीमध्ये एक छोटीशी मेस चालवते, ज्यातून ती आपल्या तीन मुलींचा सांभाळ करू शकते आणि कुटुंबाला आधार देते. एवढेच नाही तर तिच्या सामर्थ्यामुळे ती संपूर्ण समाजासाठी एक प्रेरणा ठरते लोक तिच्याकडून सल्ला घेतात आणि तिला सहजपणे आपले मानतात. तिच्या त्यागामुळे ती फार दुःखी असली तरी, ती आपल्या मुलींना हे विश्वासाने सांगते की, त्यांनी एकत्र राहायला हवे आणि एकमेकांना प्रत्येक संकटात साथ द्यायला हवी. तिचे हे शांत सामर्थ्य, प्रामाणिकपणा आणि मातृत्वाची ऊब हाच या कथेतला भावनिक गाभा आहे.

या भूमिकेबद्दल शुभांगी लाटकर म्हणतात, जेव्हा मी प्रथम या पात्राचे वर्णन ऐकले, तेव्हा गंगा माईच्या प्रामाणिकपणाने मी खूप प्रभावित झाले. हे पात्र अत्यंत वास्तवदर्शी, साधे आणि उत्तम पद्धतीने कठीण सत्यांना सामोरे जाणारे आहे. मी अगदी लगेचच होकार दिला कारण अशी पात्रे फार क्वचितच मिळतात आणि एका कलाकारासाठी ती खूप समाधान देणारी असतात. मला खरंच आनंद होतो आहे की मी गंगा माईचा प्रवास साकारू शकते आणि प्रेक्षकांपर्यंत तिचे सामर्थ्य पोहोचवू शकते. मी यासाठी खूप उत्सुक आहे.

गंगा माई की बेटियां या शोची निर्मिती रवी दुबे आणि सारगुन मेहताच्या 'ड्रीमियत ड्रामा'ने केली आहे आणि हा लवकरच झी टीव्हीवर प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

या कथेत प्रेक्षकांसाठी हे पाहणे रोचक ठरेल की गंगा माई आपल्या कुटुंबाला अपार प्रेम आणि निर्धाराने एकत्र कसे ठेवते आणि समाजाच्या निर्णयांवर मात करून आपल्या आयुष्याला अर्थपूर्ण कसे बनवते.

# एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रेचा भारत दौरा सुरू



**नागपूर, १९ जुलै :** भारतातील पहिली आणि एकमेव स्वदेशी विकसित सर्जिकल रोबोटिक प्रणाली असलेल्या एसएसआय मंत्राच्या उत्पादक एसएस इनोव्हेशन्सने आज गुरुग्राम येथील त्यांच्या मुख्यालयातून एसएसआय मंत्रा एम 'मेड इन इंडिया' सर्जिकल रोबोट यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. या रोड शोचे उद्घाटन हरियाणा सरकारचे उद्योग आणि वाणिज्य मंत्री श्री राव नरबीर सिंह यांनी केले. एसएसआय मंत्रा एम सर्जिकल रोबोट यात्रेसह भारताने आरोग्यसेवेत एका परिवर्तनकारी प्रवासाला सुरुवात केली आहे. याअंतर्गत पहिल्या मोबाईल रोबोटिक सर्जरी प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक युनिटचे अनावरण देखील करण्यात आले. या अत्याधुनिक 'टेलीसर्जरी-ऑन-व्हील्स' उपक्रमामुळे देशभरातील रुग्णालये आणि आरोग्यसेवा व्यावसायिकांना प्रगत शस्त्रक्रिया तंत्रज्ञान आणि कौशल्य निर्मितीच्या संधी थेट उपलब्ध होतील.

राजस्थानमधील प्रवासातील पहिल्या टप्प्यात किमीच्या अंतरात हून अधिक डॉक्टरांना प्रशिक्षण आणि शिकण्याच्या संधी प्रदान केल्या जातील.

राजस्थानमधील पहिल्या टप्प्यात एसएसआय मंत्रा एमचा प्रवास आणि जुलै रोजी जयपूर येथील एसएमएस मेडिकल कॉलेज येथून सुरू होईल. येथे वैद्यकीय समुदायासाठी थेट प्रात्यक्षिके आणि परस्परसंवादी प्रशिक्षण सत्रे आयोजित केली जातील. मंत्रा एम जुलै रोजी दुपारी एम्स जोधपूरला पोहोचेल. या यात्रेत जुलैपर्यंत रफकॉनमध्ये सहभागी होणार आहे. जुलै रोजी संध्याकाळी ते मथुरा दास माथुर मेडिकल कॉलेजला रवाना होईल आणि जुलै रोजी येथे विविध सत्रे होतील. राजस्थानचा हा टप्पा जुलै रोजी अजमेर येथील जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजमध्ये संपेल. यांनतर ही यात्रा पुन्हा गुरुग्रामला परत येईल.

# पॅरेंट्स डे च्या निमित्ताने सोनी सबचे कलाकार आपल्या पालकांविषयी मनापासून कृतज्ञता व्यक्त करत आहेत



**मुंबई, १९ जुलै :** पॅरेंट्स डे जवळ येत आहे, अशा वेळी सोनी सबचे कलाकार आपल्या धकाधकीच्या दिनचर्येतून वेळात वेळ काढून आपल्या माता-पित्याने आपल्याला जे प्रेम, मूल्ये आणि आधार दिला, त्याचे स्मरण करून कृतज्ञता व्यक्त करत आहेत. आपल्या माता-पित्याने दिलेली शिकवण, कठीण प्रसंगात त्यांनी दिलेले प्रोत्साहन, आपल्या जडण-घडणीतील त्यांचे योगदान याबद्दल प्रत्येक कलाकाराची एक हृद्य कहाणी आहे. सुमित राघवन, परिवा प्रणती, आशी सिंह आणि तरुण खन्ना हे सोनी सबचे लोकप्रिय कलाकार आपल्या जीवनप्रवासात लाभलेल्या मार्गदर्शनाबद्दल आपल्या माता-पित्याविषयी कृतज्ञतेचे उद्गार काढत आहेत.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत राजेश वागलेची भूमिका करणारा सुमित राघवन म्हणतो, माझ्या दृष्टीने पॅरेंट्स डे म्हणजे आपल्या जीवनाला जे सहजतेने पण दृढतेने आकार देतात, त्यांचे ऋण मानण्याचा दिवस. माझ्यासाठी माझ्या वडिलांनी हे काम केले आहे. ते माझे पहिले गुरु होते, माझे समीक्षक होते आणि माझ्या जीवनाचा भक्कम आधार होते. त्यांनी मला केवळ मूल्ये शिकवली नाहीत, तर ती स्वतः जगून दाखवली. ते ज्या स्वाभिमानाने, प्रामाणिकपणे आणि नैतिक मूल्यांच्या आधारे जीवन जगले, ते पाहून माझ्या जीवनावर त्याला सखोल प्रभाव पडला. ते नेहमी म्हणायचे की तुम्ही कितीही पुढे गेलात तरी तुमचे पाय किती जमिनीवर आहेत आणि तुम्ही इतरांना कसे वागवता हेच महत्त्वाचे असते. एक अभिनेता म्हणून देखील मला नेहमी त्यांच्या शब्दांमधून प्रेरणा मिळाली आहे. ते म्हणत असत - तू उत्तम काम कर; तुझे कामच बोलू दे. पॅरेंट्स डे हा केवळ आपल्या मोठ्या सिद्धीमधून नाही; तर दैनंदिन कृतींमधून आणि निरपेक्ष प्रेमाने आपल्या मुलांच्या जीवनाला आकार देणाऱ्या सर्व माता-पित्यांचा सन्मान करण्याचा दिवस आहे.

वागले की दुनिया: नई पीढी नए किस्से मालिकेत वंदना वागलेची भूमिका करणारी परिवा प्रणती म्हणते, माझ्यासाठी हा खूप विशेष दिवस आहे. पडद्यावर मी वंदना ज्या प्रकारे साकारली आहे, ते खरं तर मी माझ्या मुलांशी जसं वागते, त्याचंच प्रतिबिंब आहे. ज्याप्रमाणे मी माझ्या वडिलांपाशी मन मोकळे करत असे, तसेच माझ्या मुलांना कोणत्याही विषयावर माझ्याशी बोलताना मोकळेपणा वाटला पाहिजे, असे मला वाटायचे. माझे वडील आता वृद्ध होत आहेत आणि जणू ते माझा दूसरा मुलगाच झाले आहेत. अलीकडेच आपल्या नातवाकडून ते आयफोन कसा वापरायचा ते शिकले. त्यांना कुणी भेटवस्तू दिली की ते अगदी लहान मुलांप्रमाणेच खुश होतात. आम्ही सर्व जण त्यांचे खूप लाड करतो. त्यांची मुलगी असणे हे मी माझे भाग्य मानते. आणि जर पुढचे जन्म असलेच, तर त्या प्रत्येक जन्मात मला त्यांचीच मुलगी व्हायला आवडेल.

वीर हनुमान मालिकेत महादेवाची भूमिका करणारा तरुण खन्ना म्हणतो, आज मी जो कुणी आहे, तो केवळ माझ्या आई-वडिलांनी मला दिलेल्या आशीर्वादामुळे, शिकवणीमुळे आणि मूल्यांमुळे आहे. ते दोघे माझ्यासाठी निरपेक्ष आणि निःस्वार्थ प्रेमाचे प्रतीक आहेत. आज ते या जगात नसले, तरी त्यांचा आत्मा सतत माझ्यासोबत असतो याची मला खात्री आहे. मला त्यांची प्रेमाने आणि कृतज्ञतेने आठवण होत नाही, असा एकही दिवस जात नाही. आजही जेव्हा मनात संदेह किंवा गोंधळ असतो तेव्हा मी स्वतःला विचारतो की या प्रसंगी माझ्या आई-वडिलांनी मला काय सल्ला दिला असता? आणि मी त्यानुसार निर्णय घेतो. लोकांनी मला दुखावल्यानंतरही अनेक प्रसंगी मी त्याकडे दुर्लक्ष करू शकलो आहे ते केवळ याच विचाराने की माझ्या आईवडिलांना मी कुणाविरुद्ध नकारात्मक भावना मनात ठेवलेल्या आवडल्या नसत्या. ते नेहमी म्हणायचे, क्षमा करूनच तुम्ही मोठे होता. त्यांचे हे बोल आणि त्यांची सुजाणता नेहमी माझ्यासोबत असते. माता-पित्यास पुनःश्च वंदन!

उफ्फ ये लव है मुश्किल ... मालिकेत कैरी शर्माची भूमिका करणारी आशी सिंह म्हणते, माझे आई-वडील हे पहिल्यापासून माझा आधार आहेत. मी खूप लहान वयात या उद्योगात काम करू लागले. तेव्हा मी शिकत होते, झगडत होते किंवा यशाचा आनंद चाखत होते. त्या प्रत्येक वेळी ते दोघे माझ्यासोबत होते. माझे यश हे माझ्याइतकेच त्यांचेही आहे. विशेष करून माझी आई हा माझा खंबीर आधार आहे. घरचे काम सांभाळून देखील मला गरज असेल तेव्हा माझ्यासोबत सेटवर हजर राहणे, मला मार्गदर्शन देणे, माझे कौतुक करणे आणि मला सांभाळून घेणे हे सारे काही ती करते. तिने दिलेला आधार शब्दातीत आहे. या पॅरेंट्स डेच्या निमित्ताने मला मोठी स्वप्नं बघण्याची सूट दिल्याबद्दल, या प्रवासात मला साथ दिल्याबद्दल आणि माझे आश्रयस्थान बनल्याबद्दल त्या दोघांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करते.

# झी टीव्हीच्या नवीन शो छोरियाँ चली गाँव मधून उर्फी जावेदची धाकटी बहीण डॉली जावेद करणार आहे टेलिव्हिजनवर पदार्पण!

**मुंबई, १९ जुलै :** नेहमीच वेगळ्या आणि प्रभावी नॉन-फिक्शन फॉरमॅट्ससाठी ओळखली जाणारी सगळ्यांची आवडती टीव्ही वाहिनी झी टीव्ही घेऊन येतेय एक अनोखा रिॲसलिटी शो छोरियाँ चली गाँव. भारतीय संस्कृतीच्या मुळांशी जोडलेला हा शो ११ आत्मनिर्भर मुलींना त्यांच्या शहरातील आयुष्याला मागे सोडून एका खेड्यातील साध्या जीवनशैलीकडे घेऊन जातो, जिथे कुठलेही गॅजेट्स किंवा आधुनिक सुविधा नाहीत. छोरियाँ चली गाँव हा एक असा अनुभव आहे, जो भावना, संस्कृती आणि बदल यांना एकत्र आणतो आणि इंडिया आणि भारत यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न करतो.

या प्रवासात या मुलींसोबत होस्ट म्हणून साथ देणार आहेत रणविजय सिंघा, जो त्याच्या दमदार नेतृत्वशैलीसाठी आणि साधेपणासाठी प्रसिद्ध आहे. या शोमध्ये सहभागी होत आहे डिजिटल स्टार डॉली जावेद, जिचा खास स्टाईल सेंस, बेधडक स्वभाव आणि तरुण पिढीशी असलेले नाते तिला एक वेगळी ओळख देते. जरी ती इंटरनेट सेन्सेशन उर्फी जावेदची धाकटी बहीण असली, तरी डॉलीने आपल्या फॅशन सेंस, खऱ्या आणि मनाला भिडणाऱ्या कंटेंटद्वारे स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. आणि आता छोरियाँ चली गाँवच्या माध्यमातून ती पहिल्यांदाच टीव्हीच्या दुनियेत पाऊल ठेवणार आहे एका अशा रिॲशलिटी शोमध्ये, जिथे ना कोणते फिल्टर असतील, ना रीटेक्स फक्त खरे आणि नखरेरहित अनुभव.

डॉली जावेद म्हणाली, माझ्यासाठी छोरियाँ चली गाँवचा भाग होणे ही खरोखरच एक सन्मानाची गोष्ट आहे. मी खूपच उत्साहित आहे, कारण पहिल्यांदाच मला संपूर्ण भारतातल्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळते आहे. हा शो मला माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर नेतो आहे आणि असे काहीतरी करण्याची संधी देतो आहे, जे मी कधी स्वप्नातही पाहिले नव्हते. मी कधीच विचार केला नव्हता की मी एखाद्या खेड्यात जाऊन काम करेन इथपर्यंत की शेणही उचलेन! शोसाठी तयारी करताना मी थोडासा माझा स्टाईल भागही सोबत आणलाय स्किनकेअर, हेअरकेअर आणि काही फॅशन मस्ट-हॅव्स जरूर पॅक केले आहेत.

ती पुढे म्हणाली, आणि होस्ट रणविजय... मी त्यांना नेहमीच खूप ॲडमायर केले आहे. त्यांच्या होस्टिंग स्टाईलमध्ये जी खरीपणाची झलक आणि प्रेक्षकांशी असलेला कनेक्शन आहे, ती मला खूपच प्रेरणा देते. मला आशा आहे की त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळेल ते लोकांशी कसे जोडतात, कठीण प्रसंग कसे हाताळतात. मी प्रेक्षकांना फक्त एवढंच सांगू इच्छिते कृपया छोरियाँ चली गाँव नक्की पाहा.

## राशीभविष्य

**मेष :** कोणताही नवीन व्यवसाय सुरू करणे टाळा. व्यवसायात सर्व गुंतवणूक काळजीपूर्वक विचार करून करा. कामगार वर्गाला कामाची उणिव भासणार नाही. तुम्हाला आज संपत्ती मिळू शकेल.

**वृषभ :** आज साहसी काम करणाजयांना यश मिळेल. कुटुंबातील वरिष्ठ सदस्याचे मार्गदर्शन फायदेशीर ठरेल. व्यवसायात नवीन करार होतील. सरकारी मदतीने कामातील अडथळे दूर होतील.

**मिथुन :** आज अत्यंत प्रतिष्ठित लोकांशी संपर्क होईल. राजकारणात रस वाढेल. तुमच्या नम्र वागण्याने लोक प्रभावित होतील. सामाजिक आणि धार्मिक कार्यात रस वाढेल. आर्थिक स्थिती सुधारू शकाल.

**कर्क :** दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली कामे पूर्ण होण्याची शक्यता आहे. अफवांवर विश्वास ठेवू नका. मुलांसोबत बहुतेक वेळ आनंदात जाईल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता.

**सिंह :** सामाजिक कार्यात रस वाढेल. व्यवसायात लोकांना काही अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जमीन विक्रीच्या कामात गुंतलेल्या लोकांना कठोर परिश्रमानंतर मोठे यश मिळेल.

**कन्या :** अपूर्ण काम पूर्ण केल्याने तुमचे धैर्य आणि मनोबल वाढेल. आज तुम्हाला नोकरीत तुमच्या कामासोबतच काही महत्त्वाची जबाबदारी मिळू शकते. महत्त्वाच्या कामासाठी प्रवास करावा लागू शकतो.

**तुळ :** आज नोकरीत स्थान बदलण्याची शक्यता आहे. विरोधक राजकारणात अधिक सक्रिय होऊ शकतात. तुम्हाला तुमच्या विरोधकांच्या प्रत्येक हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागेल.

**वृश्चिक :** काम पूर्ण होईपर्यंत कोणाशीही कामाबद्दल चर्चा करू नका. अतिरिक्त मेहनत कामाच्या ठिकाणी परिस्थिती सुधारेल. आज जोडीदाराची काळजी वाटेल. वरिष्ठ नातेवाईकाच्या मदतीने अपूर्ण काम पूर्ण होईल.

**धनु :** आज दिवसाची सुरुवात तणावपूर्ण होऊ शकते. इकडे तिकडे अनावश्यकपणे धाव घ्यावी लागेल. कामाच्या ठिकाणी सुव्यवस्था असेल. वरिष्ठ अधिकाजयांशी समन्वयाने वागा. अनावश्यक वाद टाळा.

**मकर :** आज तुम्ही आवडत्या लोकांसोबत निवांत, आनंददायी वेळ घालवाल. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील. तुम्हाला एखाद्या शुभ कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी मिळेल.

**कुंभ :** आज क्रीडा जगताशी संबंधित लोकांना काही महत्त्वाचे पद किंवा जबाबदारी मिळू शकते. ज्यामुळे समाजात तुमचा प्रभाव वाढेल. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम कार्यरत लोकांना योग्य संधी मिळेल.

**मीन :** कुटुंबात एखादी आनंददायी घटना घडू शकते. तुमच्या नोकरीत वरिष्ठांचे आशीर्वाद तुम्हाला मिळतील. विरोधकांशी वाद घालणे टाळा. त्यांच्यापासून खूप सावध रहा.

## शब्दकोडे क्रमांक २१७०



**आडवे शब्द :-**
१) कृपाळू
४) धुणे
६) मावळतीची दिशा
८) एक श्वास रोग
१०) राज्य, राष्ट्र यावर शासन करणारी मंडळी
१२) विष
१३) न कर्त्याचा वार
१४) लग्नाचा मुलगा
१६) वर्षाव, भडीमार
१७) पूजेचे ताट
१९) धमनी
२०) अपकर्ष, खाली खाली जाणे
२२) पोरका
२४) नूतन
२६) पवित्र
२७) चकचकीत
२९) प्रश्नोत्तर
३१) तात्पर्य
३२) संताप
३४) मारलेला, नाश पावलेला
३५) द्रवपदार्थ
३७) मोठी बहीण
३८) अवास्तव
४०) विद्रूप, बेढब
४२) मनुष्य
४५) थंड वाऱ्याची लाट
४६) एक बारीक धान्य
४७) मनाला आकर्षित करणारे
४८) हिस्सेदार
४९) वर्ष, साल
५१) डोळे
५३) सैल
५४) कवडीमोल, व्यर्थ
५६) पंजाब मधील एक नदी
५७) दया, कीव
५९) मसाल्यातील एक पान
६०) जन्म-मृत्यू
६३) सर्प
६५) मनाच्या गतीने म्हणजेच फार वेगाने जाणारा
६७) ठेका
६८) ढग
६९) जाणता अजाणता
७०) शेजारी

**उभे शब्द :-**
१) रावण
२) दिवस
३) मानवी शरीर, पुरुष
४) मीठ
५) दृष्टीभेट
६) पुन्हा
७) चिलट
८) आजाऱ्यांचे आशास्थान
९) हाण!
११) गेरवा, गेरू
१५) उसनवार
१६) भ्रम, जादू
१८) च्या सह
२०) याच्या दरबारात नवरत्ने होती
२१) नदीचा काठ
२२) दाट मैत्री
२३) उपहास
२५) एक कडवे धान्य
२६) मुरली
२८) खाटीक
२९) सोशीक
३०) कमळ
३३) हत्ती
३६) समाजाचे हीत
३७) कागदाचे चार बंद
३९) पराक्रमी
४०) घराण्याचा नाश
४१) उद्याच्या नंतरचा दिवस
४३) वधू
४४) खोदकाम ४७) चर्चा
५०) एक मोठे चर्मवाद्य
५१) जुने च्या विरुद्ध
५२) मऊ
५५) उत्खननात सापडलेले भारतातील एक अति प्राचीन नगर जे सध्या पाकिस्तान मध्ये आहे
५६) राजकारभाराचे प्रमुख शहर
५७) पदार्थाचा अति सूक्ष्म भाग
५८) व्रत
६१) सोंगटी
६२) रक्षण करणारा
६४) परक्रमाचा बिल्ला
६६) शेवट
६७) अभिप्राय

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# 1 ऑगस्टपासून सर्व शासकीय कार्यालयांत बायोमेट्रिक सक्तीची - पालकमंत्री बावनकुळे

## अहवालाशिवाय वेतन अडविण्याचे आदेश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 19 ) -** जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये येत्या 1 ऑगस्टपासून बायोमेट्रिक यंत्रणा किंवा फेस ॲपचा वापर अनिवार्य करण्यात येणार आहे. बायोमेट्रिक हजेरी अहवालाशिवाय अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यात येणार नाही, असे आदेश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.




आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत पालकमंत्री बोलत होते. यावेळी आ. संजय खोडके, प्रवीण तायडे, राजेश वानखेडे, तसेच जिल्हाधिकारी आशिष येरेकर, सीईओ संजीता महापात्र, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सौंदळे, आरोग्य अधिकारी डॉ. आसोले व सर्व तालुका आरोग्य अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री म्हणाले, अनेक वैद्यकीय अधिकारी मुख्यालयात अनुपस्थित असतात, यामुळे रुग्णांना समस्या भेडसावतात. यापुढे डॉक्टरांनी मुख्यालयात राहून जबाबदारी पार पाडावी. जिल्ह्यातील आरोग्य समस्या सोडविण्यासाठी येत्या गुरुवारी आरोग्यमंत्र्यांसोबत बैठक होणार असून, त्या वेळी सर्व अधिकारी उपस्थित राहून आपले मुद्दे मांडावेत.

### आरोग्यसेवेत हयगय नको

पालकमंत्री बावनकुळे यांनी स्पष्ट केले की, तालुका आरोग्य अधिकारी आमदार-लोकप्रतिनिधींशी संवाद साधावा. स्थानिक पातळीवर सोडवता येणाऱ्या समस्या तत्काळ सोडवाव्यात. नागरिकांच्या आरोग्यविषयक अपेक्षा समजून घ्या व कुठलीही हयगय करू नका, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# मोर्शी एसटी डेपोला स्वच्छतेत 'द्वितीय गट ब' मानांकन

### बस स्थानकास 88 गुण






**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी ( दि.19 ) -** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यात राबवण्यात आलेल्या 'स्वच्छ सुंदर बस स्थानक' अभियानात मोर्शी एसटी बस स्थानकाने उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय गट 'ब' मानांकन पटकावले आहे.

अमरावती विभागातील पहिल्या टप्प्यातील सर्वेक्षणात मोर्शी बस स्थानकाला एकूण 100 पैकी 88 गुण मिळाले आहेत. हे सर्वेक्षण 9 मे 2025 रोजी महामंडळाच्या दोन अधिकाऱ्यांच्या पथकाने केले. स्थानिक पत्रकार व प्रवासी मित्र मंडळाच्या सदस्यांचा समावेश असलेल्या चार सदस्यीय पथकाने हे मूल्यांकन केले. स्वच्छता, प्रवाशांसाठी सुविधा व बस स्थानकाचा एकंदर सौंदर्य या निकषांवर आधारित प्रश्नपत्रिकेच्या आधारे हे गुणांकन करण्यात आले. या यशामुळे आगार व्यवस्थापक आशा वासनिक व त्यांच्या टीमचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

### गुणांकन तपशील

| | |
|---|---|
| प्रसाधनगृह | : 28 गुण |
| व्यवस्थापन | : 44 गुण |
| हरित बस स्थानक | : 14 गुण |
| एकूण | : 88 गुण |

# अमरावतीत देशी पिस्तुल व जिवंत काडतुसेसह दोघे अटकेत

## गाडगेनगर पोलिसांची कारवाई; दहशत निर्माण करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 ) -** शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँचने (डी.बी. पथक) देशी बनावटीचे पिस्तुल व दोन जिवंत काडतुसे (बुलेट्स) जप्त करत दोन आरोपींना अटक केली. शहरात दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या टोळीवर पोलिसांनी मोठी कारवाई करत, गंभीर गुन्ह्याचा पर्दाफाश केला आहे.



15 जुलै 2025 रोजी रात्री 9 ते 12 दरम्यान गाडगेनगर पोलिसांचे डी.बी. पथक गुन्हे प्रतिबंधात्मक गस्त घालत होते. यावेळी रात्री 10.45 वाजता माहिती मिळाली की, टिपू सुलतान मार्केटजवळ एका तरुणाने किरकोळ कारणावरून पिस्तुल काढून नागरिकांना धाक दाखवला.

यानंतर पोलिसांनी तपास सुरू केला. पुन्हा मध्यरात्री 12.40 च्या सुमारास सदर तरुण टिपू सुलतान मार्केटच्या मागील बाजूस मित्रासोबत बसलेला असल्याची माहिती मिळाली. तत्काळ कारवाई करत डिबी पथकाने मोहम्मद अनस मोहम्मद शकील (वय 20, रा. यास्मीननगर, अमरावती) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून लोखंडी देशी पिस्तुल व मॅगझीनसह एकूण 15,000 किंमतीचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास सुरु असतानाच, पोलिसांनी फरार आरोपी दानियल आईश मोहम्मद शरीफ (वय 20, रा. जनता कॉलनी, अंसार नगर) याचा शोध घेतला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी मध्यरात्री त्याला अटक केली.

दानियलकडून दोन पितळी जिवंत काडतुसे (बुलेट्स) जप्त करण्यात आल्या असून, त्याची किंमत अंदाजे 2,000 इतकी आहे. दोन्ही आरोपींविरोधात गाडगेनगर पोलीस ठाण्यात भारतीय हत्यार कायदा कलम 3, 25 सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरीया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर, विजया पंधरे, समाधान वाठोरे यांच्या नेतृत्वात पार पडली.

डी.बी. पथकाचे प्रमुख सहायक पोलिस निरीक्षक मनोज मानकर, डिबी इंचार्ज पोलिस हवालदार भारत वानखडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक जावेद अहमद, पोलिस नाईक राजेश गुरेले, पोलिस शिपाई नंदकिशोर करोची, गुलरेज खान, महेश शर्मा, रुपेश हटकर व चालक पोलिस हवालदार पवन लाड यांनी ही उल्लेखनीय कारवाई केली.

# ताडबाबा मंदिर चोरी प्रकरणात चोरटा अटकेत

### 12,600 रुपयांचा ऐवज लंपास

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.19 )-** शहरातील श्रीकृष्ण पेठेतील प्रसिद्ध ताडबाबा मंदिरात चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून, 12,600 रुपयांचा ऐवज चोरी करणाऱ्या सागर नेवारे या आरोपीस पोलिसांनी अटक केली आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटवून ही कारवाई करण्यात आली. 16 जुलै रोजी सकाळी भाविक रोशन वाले हे मंदिरात दर्शनासाठी गेले असता पितळीचा नागोबा, घंटा, चार समया, एक ताट व दानपेटीतील रोख रक्कम असा एकूण 12,600 रुपयांचा माल चोरीला गेल्याचे आढळून आले. सीसीटीव्ही तपासणीदरम्यान सागर नेवारे (रा. मोर्शी) हा इसम मंदिरात चोरी करताना स्पष्टपणे दिसून आला.

नागरिकांच्या मदतीने पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलिस चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. विशेष म्हणजे, चोरी केलेला काही माल स्थानिक भंगार व्यावसायिकाला विकल्याची माहिती पुढे आली आहे. त्यामुळे आता मोर्शी पोलिस त्या भंगार विक्रेत्यावर काय कारवाई करतात, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# हायटेंशन ओव्हरहेड टॉवर लाईन हटवण्यास सुरुवात

## दस्तुर नगर ते कोंडेश्वर दरम्यान नागरिकांना दिलासा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.19 ) -** दस्तुर नगर ते कोंडेश्वर फीडर दरम्यान गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या हायटेंशन ओव्हरहेड टॉवर लाईन हटवण्याच्या कामाला अखेर सुरुवात झाली आहे. यामूळे नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



या उच्चदाब विद्युत वाहिन्यांमुळे शेकडो घरे, दुकाने आणि सार्वजनिक बागा प्रभावित झाल्या होत्या. या टॉवर लाईनमुळे घरबांधणी, व्यावसायिक उपयोग, वाहतूक व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या दृष्टीने मोठ्या अडचणी निर्माण होत होत्या. अपघातांची शक्यता, घरांवरून जाणारी लाईन, आणि जागेचा मर्यादित वापर यामुळे रहिवासी त्रस्त झाले होते. आमदार रवि राणा यांनी विद्युत विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तत्काळ कार्यवाहीचे आदेश दिले. त्यानुसार दस्तुर नगर ते कोंडेश्वरदरम्यान टप्प्याटप्प्याने टॉवर लाईन हटवण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या निर्णयामुळे आता नागरिकांना घरबांधणी, दुकाने उभारणी, सार्वजनिक जागांचा वापर व सुरक्षेचा प्रश्न मार्गी लागणार आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या समस्येचा शेवटी निकाल लागल्याने परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त होत आहे.

# जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेचा गौरव!

## शिष्यवृत्ती परीक्षेत चार विद्यार्थिनींची गुणवत्ता यादीत घवघवीत कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.19 ) -** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी 2025 मध्ये घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा, काटी येथील इशिता दंडाळे, भूमिका धुर्वे, परी घाटोळे आणि जोया पठाण या चार विद्यार्थिनींनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवत शाळेचे नाव उज्वल केले आहे.

या विद्यार्थिनींना महाराष्ट्र शासनाच्या वतीने शिष्यवृत्ती दिली जाणार असून, त्यांच्या या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामागे मुख्याध्यापक संजय फुटाणे, वर्गशिक्षक प्रदीप गणोरकर, गजानन बिजवे, सुनीता वानखेडे, तसेच मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणातील शिक्षिका कांचन कुटे आणि संगीता काहते यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या यशामुळे गटविकास अधिकारी खुशाल पिल्लारे, गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे, शिक्षण विस्ताराधिकारी दिलीप बुरंगे, केंद्रप्रमुख अरविंद वानखडे, तसेच शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष महेंद्र भड, उपाध्यक्ष जाकीरखा पठाण आणि इतर सदस्यांनी विद्यार्थिनी आणि शिक्षकांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

# मोकाट कुत्रा चावल्याने मृत बालकाच्या कुटुंबाला 10 लाख मदतीची मागणी

## डॉ. अलिम पटेल यांची मनपा आयुक्तांकडे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.19 ) -** बिस्मिल्ला नगर येथील चार वर्षीय सैय्यद सुफियान या बालकाचा मोकाट कुत्रा चावल्याने मृत्यू झाल्याच्या दुर्दैवी घटनेनंतर, संबंधित कुटुंबाला 10 लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी माजी लेफ्टनंट कमांडर डॉ. अलिम पटेल यांनी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्याकडे केली आहे.



ही घटना 22 जून रोजी घडली होती. सुफियानला मोकाट कुत्र्याने चावा घेतल्यानंतर प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले. प्रकृती गंभीर झाल्याने त्याला नागपूरला हलवण्यात आले, मात्र 15 जुलै रोजी त्याचा मृत्यू झाला. शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढली असून, महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. यापूर्वीही मोकाट कुत्रा चावल्याच्या घटना, अपघात व जखमी होण्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. तसेच, प्राणी निर्बंध विभागातील भ्रष्टाचाराच्या तक्रारीही झाल्या आहेत.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर डॉ. अलिम पटेल, जावेद अंजुम, ॲड. शमाईल खान, सैय्यद राजीक, मौसीन खान, व किरण गुडधे, तसेच मृत बालकाचे पालक आणि नातेवाईकांनी आयुक्तांची भेट घेतली. त्यांनी तत्काळ मदत व मोकाट कुत्र्यांविरोधात कारवाईची मागणी केली. यावेळी आयुक्त सौम्या शर्मा यांनी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन दिले.

# चार महिने उलटले तरी टेंभुरखेडा पुलाचे काम अपूर्ण

## सचिन वानखडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले निवेदन

### प्रशासन अजूनही निद्रीस्त

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.19 ) -** वरुडपासून अवघ्या चार किलोमीटर अंतरावर असलेल्या टेंभुरखेडा गावातील पुलाचे काम गेल्या चार महिन्यांपासून रखडलेले आहे. या रखडलेल्या कामामुळे गावकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी असून, शाळकरी विद्यार्थ्यांपासून शेतकऱ्यांपर्यंत सर्वच स्तरातील नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.




> गेल्या चार महिन्यांपासून हे काम रखडले असून, गावकऱ्यांना दैनंदिन जीवनात मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून काम पूर्ण करावे, अन्यथा गावकऱ्यांना आता आंदोलनाच्या मार्गावर जावे लागेल.
>
> **सचिन वानखडे, ग्रामपंचायत सदस्य.**

सध्या पावसाळा सुरू असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर झाली आहे. पुलाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे गावाचा मुख्य रस्त्याशी संपर्क पूर्णत: तुटण्याच्या मार्गावर असून, प्रवास अत्यंत धोकादायक झाला आहे. अशा स्थितीतही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठेकेदार निष्क्रिय अवस्थेत असल्याचे चित्र आहे.या विरोधात ग्रामपंचायत सदस्य सचिन वानखडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता चैतन्य खंडारे यांना भेटून पुलाचे काम त्वरित पूर्ण करण्यासाठी निवेदन दिले.

### तर गुन्हे दाखल करावे लागतील

गावकऱ्यांमध्येही संतापाची लाट उसळली आहे. आमच्या त्रासाला जबाबदार कोण? जर रस्ता वाहून गेला आणि एखादी दुर्घटना घडली, तर संबंधित अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करावे लागतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. सरकारच्या आणि प्रशासनाच्या उदासीन धोरणांचा फटका सामान्य जनतेला बसत आहे, हे किती दिवस सहन करायचे? असा प्रश्न आता टेंभुरखेड्याच्या जनतेने उपस्थित केला आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून या प्रश्नाचे समाधान करावे, अशी गावकऱ्यांची जोरदार मागणी आहे.

# भातकुली पंचायत समितीमधील अनेक सर्कलचे नाव बदलले

## झेडपी गटांची पुनर्रचना जाहीर

**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली, ( दि.19 ) -** भातकुली तालुक्यात जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांच्या नवीन प्रशासकीय पुनर्रचनेची अधिसूचना निवडणूक विभागाकडून नुकतीच जाहीर करण्यात आली. यामध्ये गट व गण कायम ठेवले असले तरी त्यांची नावे व सीमा मोठ्या प्रमाणात बदलण्यात आल्या आहेत.




या नव्या रचनेनुसार, साऊर सर्कलचे नाव बदलून 'खोलापूर सर्कल' असे करण्यात आले आहे. तसेच पंचायत समिती गणांमध्येही सुधारणा करत निंबा सर्कलचे नाव 'वाठोडा शुक्लेश्वर गण' आणि पूर्णा नगर सर्कलचे नाव 'हातूर्ना गण' करण्यात आले आहे. पूर्वी साऊर, आसरा आणि खोलापूर असे तीन स्वतंत्र झेडपी गट अस्तित्वात होते. आता साऊर गटचे नामकरण खोलापूर गट असे करण्यात आले असून, या गटात साऊर, खारतळेगाव, वाठोडा शुक्लेश्वर, खोलापूर, आसरा आणि हातूर्ना या गावांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच, निंबा आणि पूर्णा नगर या पंचायत समिती गणांचे नामकरण नवीन ग्रामपंचायतींच्या समावेशासह करण्यात आले आहे.

### ग्रामपंचायती व गावांची संख्या ( सर्कलनिहाय )

| सर्कलचे नाव | ग्रामपंचायती | गावांची संख्या |
|---|---|---|
| खारतळेगाव सर्कल | 15 | 41 |
| खोलापूर सर्कल | 13 | 35 |
| आसरा सर्कल | 20 | 55 |

### आक्षेप नोंदवण्याची अंतिम मुदत — 21 जुलै

या प्रशासकीय पुनर्रचनेवर 21 जुलै 2025 पर्यंत आक्षेप नोंदवता येतील. इच्छुक नागरिक, ग्रामपंचायती, सदस्य व स्थानिक प्रतिनिधींनी आपले आक्षेप लेखी स्वरूपात संबंधित विभागाकडे सादर करावेत, असे प्रशासनाचे आवाहन आहे.

# भक्तिमार्ग

# तरूण होतेय ईश्वरसाधना!

**भौतिक आणि ऐहिक सुखे हात जोडून उभी असतानाही आज अनेकजण असमाधानी दिसतात. छोटी कुटुंबे, खुंटलेला संवाद यातून मानसिक असुरक्षितता निर्माण होते. त्यावर उपाय म्हणून अध्यात्माच्या आश्रयाला जाणारी तरुण पिढी आज सर्वत्र दिसत आहे. मानसिक समाधानाच्या शोधात ही तरुण पिढी ईश्वराच्या सान्निध्यात जाते. म्हणूनच आज मठ-मंदिरांमध्ये अशा आधुनिक तरुणाईचं दर्शन होऊ लागलं आहे.**

विशेष लेख

आजकाल अनेक मठ, मंदिरे आणि धार्मिक उपक्रमांमध्ये तरुणांची मोठी गर्दी दिसते. ठरावीक वारी, मंदिरांमध्ये दर्शनासाठी जाणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. छोटी कुटुंबपद्धती, त्यातील ताणतणाव, गतिमान जग यामुळे मनस्व-स्थ्य हरवत आहे. आजकाल सर्वत्र झटपट श्रीमंत होण्याची वृत्ती वाढली आहे. त्यातूनच भ्रष्टाचार बोकाळतो आहे. भोगवादी प्रवृत्तीही निर्माण होत आहे. यामुळे संस्कारक्षम पिढी संपत चालली आहे की काय असं वाटतं. या पार्श्वभूमीवर अनेक मठ, मंदिरे, आश्रमांमध्ये दिसणारे चित्र लक्षवेधी भासतं.

संगणकीय युगामुळे ज्ञानाच्या कक्षा विस्तारल्या आहेत. त्याचबरोबर नोकरी व्यवसायातही अनेक क्षेत्रं खुली झाली आहेत. तरुण पिढीच्या आकांक्षाही वाढल्या आहेत. त्यातून निर्माण होणाऱ्या स्पर्धेत टिकायचं असेल तर प्रचंड धावपळ करावी लागते. त्यातून दैनंदिन जीवनात ताणतणाव निर्माण होतो. या ताण-तणावापासून काही वेळ सुटका मिळवण्यासाठी एखाद्या मठात किंवा मंदिरात ईश्वराच्या सान्निध्यात बसावं असं अनेकांना वाटू लागलं आहे. देवधर्म हे वयस्कर व्यक्तींसाठीच असतात, अशी पूर्वी समजूत होती; पण आता तरुणवर्गही या देवधर्माकडे मोठ्या संख्येकडे आकर्षित होऊ लागला आहे तो मानसिक तणावावर औषध शोधण्यासाठीच. आजकाल गल्लीबोळातील छोट्या-मोठ्या मंदिरातही गर्दी होऊ लागली आहे. काही वर्षांपूर्वी अक्कलकोट, गाणगापूर, महालक्ष्मी आदी देवस्थानी भाविक मर्यादित संख्येने येत. सध्या ही संख्या लाखोंच्या घरात जाते. श्री स्वामी समर्थांच्या जयंती, पुण्यतिथी दिनी तसेच दत्तजयंतीला अक्कलकोट, गाणगापूर येथे येणाऱ्या भाविकांची संख्या पाहिली की आषाढी वारीची आठवण आल्याशिवाय रहात नाही. हीच परिस्थिती शिर्डी, शेगांव, तसेच राज्यातील इतर अनेक धार्मिक ठिकाणी दिसते. संत तुकाराम आणि संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यातही दरवर्षी तरुण-तरूणींची संख्या लक्षणीयरित्या वाढत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्यानं वारी ङ्गहायटेकङ्क करण्याचे प्रयत्न होत आहेत. पारंपरिक वेशात हातात वीणा घेऊन उभा असलेला वारकरी मोबाईल कानाशी लाऊन बोलत असतो; तर जीन्स पँट, टी-शर्ट घातलेल्या तरुण-तरूणींचा घोळका ग्यानबा-तुकारामाचा गजर करत चाललेला दिसतो. वारकऱ्याची आधुनिकता आणि तरुणांनी जोपासलेली परंपरा यांचा सुरेख मेळ आपल्याला पालखी सोहळ्यात दिसून येतो. अर्थात तरुण आणि मध्यमवयीन वर्गामध्ये ही धार्मिकता निर्माण होण्याची अनेक कारणे आहेत.

अलिकडच्या काळात एकत्र कुटुंबपद्धती संपुष्टात येत आहे. भौतिकवाद वाढल्याने सर्व सुखसोयी हात जोडून उभ्या आहेत. पती-पत्नी दोघेही नोकरी करत असल्याने उत्पन्नाची बाजू भक्कम झाली आहे. आर्थिकदृष्ट्या संपन्न पिढीला सर्व सुखसोयी हाताशी असताना एक प्रकारचं ङ्गएकटेपणङ्क जाणवू लागलं आहे. पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीमुळे कुटुंबाची जबाबदारी वडील किंवा थोरला भाऊ यांच्यावर होती. ते घराची काळजी घेण्यास समर्थ होते. आज कुटुंबाचा आकार कमी झाला. त्यातही पती-पत्नी दोघेही नोकरी-व्यवसायात गुंतल्याने कुटुंबाची जबाबदारी पार पाडताना त्यांच्या नाकी नऊ येत आहे. पूर्वी नोकरीच्या ठिकाणी किंवा वैयक्तिक जीवनात एखादा प्रश्न निर्माण झाल्यास त्या संबंधी घरातील इतरांशी चर्चा करुन मार्ग काढता येत असे. आजकाल ही परिस्थिती नसते. एकमेकांशी संवाद साधण्यास किंवा मन म ोकळे करण्यासही वेळ मिळत नाही आणि मिळाला तरी समोरील व्यक्तीला वेळ नसतो किंवा तो ऐकण्याच्या मन:स्थितीत नसतो. त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरं मिळू शकत नाहीत. अशा परिस्थितीत माणसाची घुसमट होऊ लागते. आता कसे होणार, या प्रश्नाने तो अस्वस्थ होतो. त्यामुळे तणाव वाढतो. हा तणाव दूर करण्यासाठी त्याची पावलं नकळत मठ, मंदिरं, आदी ठिकाणी वळतात. एकटेपणाच्या जाणीवे-बरोबरच वाढती असुरक्षितताही अनेकांना अध्यात्माकडे वळवू लागली आहे. सध्या वाहनांची संख्या अफाट झाली आहे. प्रत्येकाला वेळेवर जाण्याची घाई असल्याने वाहतुकीचा वेगही अमर्याद वाढतो. खराब रस्ते तसेच नागरी असुविधांना तोंड देत आपण सुखरूप घरी जातो का? ही चिंता सर्वांना सतावत असते.



त्याचप्रमाणे आजूबाजूच्या अस्थिर राजकीय, सामाजिक परिस्थितीमुळेही असुरक्षिततेची भावना येते. अशा वेळी आधार वाटतो तो एखाद्या ईश्वरीय शक्तीचा. त्याच्या सान्निध्यात गेल्याने भीती निघून जाते, मानसिक समाधान प्राप्त होते, असा अनेकांचा अनुभव आहे.

मठ, मंदिरं आदी ठिकाणी देवतांच्या दर्शनासाठी जाणाऱ्यांमध्ये मोठ्या पदांच्या व्यक्तींपासून सर्वसामान्यांपर्यंत सर्वांचा समावेश असतो. देवदेवतांना सर्वजण समानच असतात ते कधीच गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव करत नाहीत. तरी सुद्धा दर्शनाला येणाऱ्या भाविकांना व्यवस्थापनाच्या धोरणामुळे हा दुजाभाव ठायीठायी जाणवतो. सर्वसामान्य लोक कठिण प्रसंगात देवाला नवस बोल-तात. त्याचप्रमाणे आजकाल राजकीय व्यक्ती, अभिनेते यांच्यामधेही ही प्रवृत्ती निर्माण झाली आहे. या मंडळींच्या देवदर्शनाला प्रसिद्धीही अम ाप मिळते. देवदर्शनाला जातानासुद्धा हे लोक प्रसिद्धीचे वलय घेऊन जातात. देवदेवतांना दिलं जाणारं दान पूर्वी गुप्त राखलं जाई. आपलं नाव-गाव न सांगता हे दान केलं जाई, पण आता ही परिस्थिती बदलली आहे. आजकाल देणगीदारांची नावं मोठमोठ्या फलकावर ला-वलेली दिसतात; त्यांच्या सत्कार होतो. नुकत्याच झालेल्या गुरूपोर्णिमा उत्सवात एका भक्तानं शिर्डीत साईबाबांच्या चरणी १२ किलो सोन्याच्या पादुका अर्पण केल्या. यापूर्वी याच भाविकानं साईबाबांसाठी चांदीचं सिंहासन अर्पण केलं होतं. या दोन्ही घटनांना माध्यमांनी मोठी प्रसिध्दी दिली. खरं तर साईबाबांची राहणी, त्यांची विचारसरणी, त्यांचा उपदेश यांचा अभ्यास केला असता त्यांच्यासाठी अशा सोन्या-चांदीच्या पादुकांची, सिंहासनाची खरंच आवश्यकता आहे का, याचा विचार व्हायला हवा. परंतु आले भक्ताच्या मना..... असं म्हणत या घटनांबाबत फारसं विचारमंथन होत नाही.

आजकाल तणावमुक्तीचे वेगळे असे कार्यक्रम होत आहेत. अध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठ अभ्यासू व्यक्तीकडून अशा कार्यक्रमाचे आयोजन केलं जातं. या कार्यक्रमासाठी प्रत्येक ठिकाणी हजारोंच्या संख्येने लोक येत असतात. एखाद्या ईश्वरीय शक्तीचं वरदान लाभलेल्या ऋषीतुल्य व्यक्तीला ङ्गगुरूङ्क मानलं जातं. त्यांनी दाखवलेल्या मार्गाने ध्यानधारणा, नामजप आदी केले जाते. या प्रकारामध्ये सातत्य ठेवल्यास ताण-तणावापासून दूर राहता येते. रामदेव बाबांचे योगासनाचे कार्यक्रम असो की, एखाद्या योगी पुरुषाचा सत्संग असो अशा ठिकाणी तरुण आणि मध्यमवयीन मोठ्या संख्येने आल्याचं चित्र दिसतं. आजकाल केवळ धार्मिक कार्यक्रम प्रसारित करणाऱ्या वाहिन्यांची संख्याही वाढली आहे. त्यामुळे हजारो, लाखो लोकांना घरबसल्या अशा कार्यक्रमांचा लाभ घेणं सोयीचं झालं आहे.

ईश्वरी शक्तीच्या या ओढीमागं प्रश्नांची वाढती संख्या कारणीभूत आहे. बुद्धीच्या जोरावर मानवाने प्रचंड झेप घेतली असली तरी प्रश्नांची व्याप्तीही वाढत आहे. सर्वच प्रश्नांची उत्तरं आर्थिक बाबींनी सुटतात असं नाही. सर्व उपाय खुंटतात त्याठिकाणी ईश्वरी शक्तीचा आधार घ्यावा लागतो आणि अशा ईश्वरी साधनेमुळे प्रश्नांना सामोरं जाण्याचं धाडस येतं. प्रश्न सुटण्याचे मार्ग सापडतात. कोणी कोणत्या देवतेची उपासना करावी, कोणाच्या सत्संगाला जावे, याबाबत प्रत्येकाला स्वातंत्र्य आहे. शेवटी श्रद्धा महत्त्वाची. अंतरिक श्रद्धेतून निर्माण होणारी भक्ती सर्वश्रेष्ठ असते. सध्या सर्वांनाच ताणतणाव, असुरक्षितता यांनी ग्रासलं आहे. अशा वेळी कोण कोणाला धीर देणार, म्हणून एखाद्या शक्तीचा आधार घ्यावा लागतो. प्रपंच करताना परमार्थही करणं आवश्यक आहे. प्रापंचिक कटकटीतून काही काळ बाजुला जाऊन एका वेगळ्या विश्वात रमणं महत्त्वाचं आहे. त्यासाठीच आजकाल मठ, मंदिरं आदी ठिकाणी गर्दी वाढते आहे. वैज्ञानिक प्रगतीबरोबर ऐहिक सुखही आलं. पण आत्मिक सुखासाठी अध्यात्माचा आधार घ्यावा लागतो आणि तो घेतल्यास जीवन तणावरहीत आनंदी होऊ शकते, हेच अंतिम सार आहे.

## कामातून मिळवा आनंद

बोध

प्रत्येक काम आनंददायी असतं. प्रत्येकाच्या बघण्याच्या दृष्टीकोनात फरक असतो. काहींना एखाद्या कामात निराळा आनंद मिळतो तर काहींना तेच काम वैतागवाणं वाटतं. एका कथेच्या माध्यमातून आपण हा विचार समजून घेऊया. एका गावात काही मजूर दगडाचे खांब घडवत होते. त्याच वेळी एक साधू तिथून जात होता. मजुरांना खांब घडवताना बघून साधू



थांबला. इथे कशाची निर्मिती होत आहे, असा प्रश्न त्याने मजुराला केला. दगड फोडतोय मी, दिसत नाही का? असं मजूर वैतागून म्हणाला. हो, दिसतंय खरं पण इथे काय तयार होत आहे, हे मला सांग, असं तो साधू म्हणाला. मला माहित नाही... इथे दगड फोडताना जीव जात आहे आणि इथे काय बनणार अशा प्रश्न या साधू महाराजांना पडलाय, असं तो मजूर पुटपुटला. साधू मुकाट्याने निघून गेला.

पुढे त्याला दुसरा मजूर दिसला. त्याने त्याला हाच प्रश्न केला. मजूर म्हणाला, साधूबाबा इथे काहीही निर्माण होवो, मला त्याच्याशी काहीच देणं-घेणं नाही. मला दिवसभराच्या कामाचे १०० रूपये मिळतात. त्यातच मला समाधान आहे. साधू पुढे गेला. तिथे त्याला अजून एक मजूर भेटला. साधूने त्यालाही तोच प्रश्न केला. इथे मंदिराची निर्मिती केली जाणार आहे, असं त्या मजुराने सांगितलं. तो पुढे म्हणाला, या गावात कोणतंही मंदिर नाही. धार्मिक उत्सव साजरे करण्यासाठी इथल्या लोकांना दुसऱ्या गावातल्या मंदिरात जावं लागतं. त्यामुळे इथेच मंदिर उभारायचं ठरलं. मीही याच गावचा आहे. गावचे सगळे मजूरही याच गावचे आहेत. दगड फोडताना मारलेल्या प्रत्येक हातोडीतून मला मधूर संगीत ऐकू येतं. मी खूप आनंदी आहे. काही दिवसांनी इथे मंदिर उभारलं जाईल. जत्रा भरेल, आरती होईल. हा विचार करून मी आनंदी असतो. माझ्यासाठी हे फक्त एक काम नाही तर आनंद आहे. रात्री झोपताना डोक्यात मंदिरा-चेच विचार असतात. सकाळी उठल्यावर मी कामाला लागतो. खूपच उत्साह जाणवला की भजन गायला सुरूवात करतो. आयुष्यात काम करताना मी कधीच इतका उत्साही नव्हतो, इतका आनंदी नव्हतो. साधू खूश झाला. तो म्हणाला, की हेच जीवनाचं रहस्य आहे. फरक फक्त दृष्टीकोनाचा आहे. प्रत्येक कामाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिलं तर त्यातून आनंद घेता येतो.

## शिकवण दोह्यांची

धार्मिक परंपरा



संत कबीर यांच्या दोह्यांमधून आयुष्यात सुख आणि यश कसं मिळवायचं हे सांगण्यात आलं आहे. संतांनी आपल्या अभंगांमधून, दोह्यांमधून रचनांमधून भक्तांना कायम मार्गदर्शन केलं आहे. त्यांचे दोहेही असेच दिशादर्शक आहेत. या दोह्यांमधून आपल्याला बरंच काही शिकता येईल.

**धीरे-धीरे रे मना,**
**धीरे सब कुछ होय।**
**मार्ली सींचे सौ घडा,**
**ऋतु आए फल होय।।**

याचा अर्थ असा की, आयुष्यात आपण धीर धरायला हवा. सगळं काही मनासारखं होईल. पण त्यासाठी थोडा वेळ जावा लागेल. माळ्याने झाडाला दररोज १०० घडे पाणी घातलं तरी फळ हे त्या त्या ऋतूमध्येच येणार आहे.

**तिनका कबहुं ना निन्दिये।**
**जो पांवन तर होय।।**
**कबहुं उडी आंखिन पडे।**
**तो पीर घनेरी होय।**

याचा अर्थ असा की पायात येणाऱ्या तृणाचीही कधी निंदा करू नये. कारण हेच तृण डोळ्यात गेलं तर खूप वेदना होतात.

**जिन खोजा तिनपाइया,**
**गहरे पानी पैठ।**
**मैं बपुरा, बूडन डरा।**
**रहा किनारे बैठ।।**

याचा अर्थ असा की, प्रत्येकाला मेहनतीचं फळ मिळतं. जेवढी मेहनत तेवढं फळ. पाण्याच्या डोहात जाणारी व्यक्ती काही तरी घेऊन येतेच. घाबरून किनाऱ्यावर बसून राहिलेल्याला काहीही मिळत नाही.

मांगन मरण समान है,
मति मांगो कोई भीख।
मांगन ते मारना भला,
यह सतगुरु की सीख।।

याचा अर्थ असा की, कोणापुढे कधीही हात पसरू नये. कोणापुढे हात पसरायला लागणं मृत्यूपेक्षाही भयंकर आहे.

## शोध अमरनाथ गुहेचा...

जाणून घ्या

सध्या अमरनाथ यात्रा सुरू आहे. बर्फाच्या शिवलिं-गाचं दर्शन घेण्यासाठी भक्तमंडळी उत्सुक आहेत. अमरनाथाच्या पवित्र गुहेत शंकराने पार्वतीला अमरकथा सांगितली होती, असं मानलं जातं. अमरनाथची ही यात्रा कशी लोकप्रिय झाली? या गुहेचा शोध नेमका कोणी लावला, याविषयीची ही रंजक माहिती... अमरनाथ गुहेचा शोध सोळाव्या शतकात एका मुस्लीम मेंढपाळाने ला-वला, असं जाणकारांचं म्हणणं आहे. यानंतर या स्थानी भक्तमंडळींचा वावर सुरु झाला. याबाबत एक आख्यायिका सांगितली जाते. ती अशी की, हा मेंढपाळ मेंढ्यांना चरायला घेऊन गेला होता. मेंढ्या चारता चारता तो खूप दूर, निर्जन स्थळी पोहोचला. या ठिकाणी त्याची भेट एका साधूसोबत झाली. या साधूने त्याला कोळशाने भरलेली टोपली दिली. ही टोपली घेऊन मेंढपाळ घरी आला. त्याने टोपली उघडली. या टोपलीतल्या कोळश्यांचं रूपांतर सोन्यात झालं होतं. मेंढपाळाला भरपूर सोनं मिळालं. या घटनेचं त्याला खूपच आश्चर्य वाटलं. गरीब मेंढपाळ हरखून गेला. त्याने दुसऱ्या दिवशी साधूला भेटायचं ठरवलं. तो त्याच ठिकाणी साधूला भेटायला



गेला. पण त्याचा कुठेच पत्ता नव्हता. तिथे त्याला एक भव्य गुहा दिसली. हीच अमरनाथाची पवित्र गुहा असं मानलं जातं. त्यानंतर या गुहेला तीर्थस्थानाचा दर्जा मिळाला. बाबा अमरनाथाची गुहा म्हणून लोकप्रियता मिळाली. त्यामुळे बाबा अमरनाथला भक्तांनी दिलेल्या दानातला काही हिस्सा या मुस्लीम मेंढपाळाच्या वंशजांना दिला जातो.

## तोचि मूर्ख जाणावा...

दासबोधातून



समर्थ रामदासांनी दासबोधातल्या दुसऱ्या दशकातल्या पहिल्या समासात मुर्खांची लक्षणं सांगितली आहेत. या जगात मूर्ख कोण हे या लक्षणांवरून ओळखता येईल. समर्थ रामदास म्हणतात, येक मूर्ख, येक पढतमूर्ख, उभय लक्षणीं कौतुक। श्रोतीं सादर विवेक। केला पाहिजे।।४।। मुर्खांचे दोन प्रकार आहेत, असं समर्थ राम दास म्हणतात. मूर्ख आणि पढतमूर्ख असे हे प्रकार होत. या दोन्ही प्रकारांचे वर्णन समर्थांनी केले आहे. ही लक्षणे नीट ऐकून श्रोतेमंडळींनी त्यावर विचार करायला हवा, असं समर्थ सांगतात. समर्थ रामदास पढतमूर्खांची लक्षणं सांगतात. ते म्हणतात, जे प्रापंचिक जन, जयांस नाहीं आत्मज्ञान। जे केवळ अज्ञान त्यांची लक्षणे ।।७।। जन्मला जयांचे उदरीं। तयांसी जो विरोध करी। सखी मानिली अंतुरी। तो येक मूर्ख।।८।। परस्त्रीसीं प्रेमा धरी। श्वसुरगृही वास करी। कुळेंविण कन्या वरी। तो येक मूर्ख।।१०।।

आत्मज्ञान नसलेल्या, केवळ प्रपंचात रमणाऱ्या, अत्यंत अज्ञानी अशा लोकांची ही लक्षणं आहेत. ज्यांच्या उदरातून जन्म घेतला त्या आई-वडिलांना विरोध करणारा, केवळ पत्नीला सखी मानणारा मूर्ख समजावा. परस्त्रीवर प्रेम करणारा, सासुरवाडीला जाऊन राहणारा, कुळाचा विचार न करता कोणत्याही मुलीशी विवाह करणारा मूर्ख असतो. मुर्खांची अनेक लक्षणं आहेत. समर्थांनी त्यातल्या काही लक्षणांचं वर्णन या समासात केलं आहे. ते पुढे म्हणतात, आपली आपण करी स्तुती। स्वदेशीं भोगी विपत्ति। सांगे वडिलांची किर्ती तो येक मूर्ख।।१२।। अकारण हास्य करी। विवेक सांगता न धरी। जो बहुतांचा वैरी। तो येक मूर्ख।।१३।। स्वत:ची स्तुती करणारा, स्वदेशात राहुनही विपत्ती भोगणारा, आपल्या पूर्वजांची कीर्ती सांगणारा मूर्खच असतो. कारण नसताना हसणारा, विवेक शिकूनही त्याचे ग्रहण न करणारा, ज्याचे अनेक वैरी असतात तो मूर्ख मानला जातो.

मुर्खांची इतर लक्षणंही समर्थ वर्णन करतात. ते म्हणतात, लक्ष्मी आलियावरी। जो मागील वोळखी न धरी। देवीं ब्राह्मणी सत्ता करी। तो येत मूर्ख ।।६८।। अक्षरें गाळून वाची। कां तें घाली पदरिचीं। नीघा न करी पुस्तकांची। तो येक मूर्ख।।७०।। आपण वाचीना कधीं। कोणास वाचावया नेदी। बांधोन ठेवी बंदीं। तो येक मूर्ख।।७१।। उत्तम लक्षणे घ्यावी। मूर्ख लक्षणे त्यागावी। असंही समर्थ म्हणतात. सत्ता-संपत्तीचा लाभ झाल्यावर अनेकजण जुनी ओळख ठेवत नाहीत, देवावर सत्ता गाजवतात अशांनाही समर्थ मूर्ख असं संबोधतात. वाचन करताना अक्षरं गाळून वाचणारा, पुस्तकांची निगा न राखण-ारा समर्थांच्या दृष्टीने मूर्खच आहे. स्वत: ग्रंथ न वाचणारा, इतरांना वाचायला न देणारा, ग्रंथ बासनात बांधून ठेवणाराही मूर्खच मानला जातो. मूर्ख लक्षणं सोडून उत्तम लक्षणांचा अंगिकार लोकांनी करायला हवा. म्हणूनच पुढच्या समासांमध्ये समर्थांनी उत्तम लक्षणंही सांगितली आहेत.

## मार्गदर्शन विष्णूपुराणातलं...

पुराणांमधून



हिंदू धर्मात अठरा महापुराणं आहेत. त्यापैकी एक म्हणजे विष्णू पुराण. मनुष्याने जीवनात नेमकं काय करावं, कसं वागावं, दैनंदिन जीवनात कोणत्या गोष्टींचं पालन करावं याबाबतचं ज्ञान वेद-पुराणांमधून देण्यात आलं आहे. यातल्या अनेक बाबी आजच्या काळातही लागू पडतात. दैनंदिन जीवनातली कार्यं करताना कोणत्या गोष्टींचं पालन करावं, याबाबतचं मार्गदर्शन विष्णू पुराणात करण्यात आलं आहे. याबाबत जाणून घेऊया...

* शूचिर्भूत होण्यासाठी दररोज स्नान केलं जातं. स्नानामुळे शरीर स्वच्छ होतं. आपण ताजेतवाने होतो पण जास्त काळपर्यंत स्नान केल्याचे काही दुष्परिणामही आहेत. विष्णू पुराणातही याबाबत नमूद करण्यात आलं आहे. स्नान करण्याचा मूळ उद्देश लक्षात घेऊन वेळेत स्नान करायला हवं.

* झोपण्याच्या सवयीकडे लक्ष द्यायला हवं. झोप कमी असली काय किंवा जास्त असली काय, वाईटच ठरते. प्रत्येकाने आपल्या झोपण्याच्या वेळेकडे लक्ष द्यायला हवं. रात्री लवकर झोपून पहाटे ब्राह्ममुहुर्तावर उठायला हवं, असं विष्णूपुराण सांगतं.

* विष्णूपुराणात व्यायामाचं महत्त्व सांगण्यात आलं आहे पण व्यायामाचा अतिरेक वाईटच. आपली गरज आणि शारीरिक क्षमता लक्षात घेऊन प्रत्येकाने व्यायाम करायला हवा.

* यासोबतच इतर काही बाबी विष्णूपुराणानुसार निषिध्द मानल्या गेल्या आहेत. चार रस्ते एकत्र येतात तो भाग रात्रीच्या वेळी ओलांडू नये, असं विष्णूपुराणात सांगण्यात आलं आहे. रात्रीच्या वेळी या भागात वाईट शक्तींचा वास असल्याने सर्वसामान्य माणसाला आव्हानांचा सामना करावा लागू शकतो, असं यात नमूद करण्यात आलं आहे.

* रात्रीच्या वेळी स्मशानात जाऊ नये, असंही विष्णूपुराणात सांगण्यात आलं आहे.

* वाईट किंवा चारित्र्यहीन लोकांपासून रात्रीच्या वेळी लांब राहायला हवा. अशी माणसं रात्रीच्या वेळी कुकर्म करू शकतात. त्यामुळे त्यांच्यापासून चार हात लांब राहणंच उत्तम, असं विष्णूपुराण सांगतं.

## अनोखं मंदिर गंगेचं...

तीर्थक्षेत्र

हिंदूधर्मीयांच्या दृष्टीने गंगा ही अत्यंत पवित्र नदी. गंगेत स्नान केल्याने सात जन्मांची पापं नष्ट होतात असं म्हटलं जातं. म्हणूनच गंगामातेची मनोभावे पूजा केली जाते. बनारसच्या गंगाघाटावर गंगेची आरती केली जाते. गंगापूजनाचं हे दृष्य अत्यंत रमणीय असतं. बनारससोबतच देशातल्या इतर काही ठिकाणी गंगेची मंदिरं आहेत. या मंदिरांमध्ये गंगेची मूर्तीरूपात पूजा केली जाते. असंच एक अनोखं मंदिर राजस्थानातल्या जयपूरमध्ये आहे. महाराजा सवाई माधोसिंह द्वितीय यांनी या मंदिराची निर्मिती केली. या मंदिराची अनेक वैशिष्ट्यं आहेत. गंगेचं हे मंदिर स्थापत्यकलेचा उत्तम नमुना मानलं जातं. यासोबतच गाभाऱ्यात असलेला सुवर्णकलश मंदिराचं खास आकर्षण आहे. या मंदिरातल्या गंगा मातेच्या मूर्तीच्या शेजारी जवळपास ११ किलो वजनाचा सुवर्णकलश ठेवण्यात आला आहे. या कलशात गंगाजल ठेवण्यात आलं असून कलशाच्या सुरक्षेसाठी बंदूकधारी पहारेकऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या कलशाची स्थापना १०३ वर्षांपूर्वी करण्यात आली होती. मंदिराच्या



निर्मितीलाही एवढाच काळ लोटला आहे. एवढ्या मोठ्या काळानंतरही कलशातल्या गंगाजलाचा एक थेंबही कमी झालेला नाही. सवाई माध-ोसिंह द्वितीय यांच्या पत्नीच्या इच्छेनुसार या मंदिराची निर्मिती करण्यात आली आहे. या मंदिराच्या बांधकामासाठी संगमरवर आणि लाल दगडांचा वापर करण्यात आला आहे. मंदिरात गंगेचा महिमा वर्णन करणारा एक शिलालेखही आहे. कवी पंडित रामप्रसाद यांनी हा लेख लिहिला आहे. तसंच श्रीकृष्णाच्या आयुष्याशी संबंधित चित्रंही येथे आहेत.

# तुकडोजी महाराजांनी लोकप्रबोधनातून राष्ट्रभक्ती रुजवली

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन ■ विदर्भस्तरीय खंजरी भजन स्पर्धेचा समारोप







■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी भजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागात लोकांचे प्रबोधन केले. समाज परिवर्तन केले. राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्यासाठी राष्ट्रभक्ती रुजवण्याचे काम केले, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले. महाराजांचे विचार सर्वव्यापी करण्यासाठी, नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे आवाहनही त्यांनी केले.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित विदर्भस्तरीय खंजारी भजन स्पर्धेचा पुरस्कार सोहळा पार पडला. त्यावेळी गडकरी बोलत होते. यावेळी श्रीक्षेत्र अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे श्रीनाथ पीठाधीश्वर जितेंद्रनाथ महाराज, अ. भा. गुरुदेव सेवा मंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंत बोथे गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते हेमंत काळमेघ, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, ज्ञानेश्वर रक्षक, अ. भा. गुरुदेव सेवा मंडळाचे अशोक यावले, संताजी सभागृहाचे अध्यक्ष नानाभाऊ ढगे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

भजने मनोरंजनासाठी नाहीत, समाजावर सकारात्मक परिणाम करण्यासाठी आहेत. महाराजांच्या भजनांमध्ये हा भाव आपल्याला बघायला मिळतो, याचा उल्लेख करीत गडकरी म्हणाले, ग्रामविकास ही ग्रामगीतेची संकल्पना आहे. ग्रामीण भागाचा विकास कसा व्हायला हवा, आदर्श गाव कसे असावे हे राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेमध्ये सांगितले. पण हा विचार शब्दांपुरता मर्यादित न राहता आपल्याला कृतीमध्ये उतरवावा लागेल.

खासदार सांस्कृतिक महोत्सवात ४ हजार गुरुदेव भक्तांनी भजन गावे अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. नागपूर विद्यापीठाचे राष्ट्रसंतांचे विद्यापीठ गीत ५० हजार विद्यार्थ्यांनी एकावेळी गावे आणि विश्वविक्रम करावा, अशी इच्छा असल्याचेही ते म्हणाले.

### गुरुकुंज आश्रम मोझरी येथील स्वर गुरुकुंजाचे भजन मंडळ ठरले महाविजेता

प्रास्ताविक प्रा. अनिल सोले यांनी केले. संचालन बाळासाहेब कुळकर्णी यांनी केले. डॉ. श्रीरंग वराडपांडे यांनी आभार मानले. श्याम देशपांडे, देवेंद्र यादव, स्नेहल पाळवीकर, विजयराव बोरीकर, उमेश बारापात्रे, फाल्गुन खुर्जेकर, शुभांगी नाफड, रश्मी किन्हीकर, वैकुंठ उज्जैनकर, कृष्णा डोमके यांनी तीन दिवस झालेल्या स्पर्धेचे परीक्षण केले. गडकरी यांच्या हस्ते त्यांना गौरविण्यात आले.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वर गुरुकुंजाचे भजन मंडळ गुरुकुंज आश्रम, मोझरीने पटकावला. त्यांना १ लाख रुपये पुरस्कार देण्यात आला. आदर्श गुरुदेव सेवा मंडळ निमगव्हाण चांदूर रेल्वे यांना द्वितीय क्रमांकादाखल ७१ हजार रुपये तरसार्थक गुरुदेव सेवा मंडळ हस्तापूर बाभुळगाव यांना तृतिय क्रमांकादाखल ५१ हजार रुपये देण्यात आले. चौथा क्रमांक गुरुदेव मानवसेवा छात्रालय भजन मंडळ, मोझरी (४१ हजार रुपये), पाचवा क्रमांक अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ हिरापूर बोथली चंद्रपूर (३१ हजार रुपये), सहावा क्रमांक जय वळेकर माऊली भजन मंडळ खामगाव (२१ हजार रुपये) आणि गुरुमाऊली भजन मंडळ साहूर आष्टी यांना सातव्या क्रमांकासाठी ११ हजार रुपयांचा पुरस्कार देण्यात आला.

गोपाल प्रासादिक मंडळ साकोली, नक्षत्र कला मंदिर नागपूर, गुरुमाऊली भजन मंडळ नागपूर, गुरुदेव भजन मंडळ नागपूर, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ गिरड, रत्नाक्षी भजन मंडळ नागपूर, नवयुवक भजन मंडळ कळमेश्वर, गुरुदेव सेवा भजन मंडळ जयताळा नागपूर, गुरुदेव सेवा प्रार्थना मंडळ नवे बीडीपेठ नागपूर, गुरुदेव सेवा भजन मंडळ अजुर्नी मोरगाव, गुरुदेव बाल सेवा मंडळ समुद्रपूर गिरड, ग्रामनाथ सेवा भजन मंडळ राळेगाव, जय बजरंग गुरुदेव भजन मंडळ दहेगाव रंगारी आणि साईकृपा भजन मंडळ म्हाळगी नगर नागपूर यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक प्रदान करण्यात आले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनांवर आधारीत विदर्भस्तरीय स्पर्धेच्या प्राथमिक फेरीमध्ये सलग दोन दिवस २७१ भजन मंडळानी सहभाग नोंदवला. त्यातील २१ मंडळांची महाअंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पारंपरिक चालींवर आधारित प्रबोधनात्मक व राष्ट्रभक्तीवर आधारित विषयांवरची भजनं यावेळी मंडळांनी सादर केली. विशेष म्हणजे नागपूर जिल्ह्याबाहेरील सहभागी मंडळांना ४ हजार रुपये व नागपूर शहरातील सहभागी मंडळांना २ हजार रुपये मानधन देण्यात आले.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे अध्यक्ष प्रा. अनिल सोले, गुरुदेव सेवा मंडळाचे ज्ञानेश्वर रक्षक व अशोक यावले, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव जयप्रकाश गुप्ता, उपाध्यक्ष गौरीशंकर पाराशर व माजी आमदार अशोक मानकर, कोषाध्यक्ष राजेश बागडी, बाळासाहेब कुळकर्णी, दीपक खिरवडकर, अविनाश घुशे, विजय फडणवीस, राजेश कुंभलकर, मनिषा काशीकर, किशोर पाटील, भोलानाथ सहारे, श्रीरंग वराडपांडे, दिलीप जाधव, शशांक खेकरे आदी पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले.

#### भजन हे आत्म्याचे भोजन व्हावे - जनार्दनपंत बोथे गुरुजी

तुकडोजी महाराज बरेचदा रेल्वेच्या प्रवासात भजन लिहायचे. महाराजांनी भजनांचे वैभव आपल्याला दिले. भजन हे खऱ्या अर्थाने आत्म्याचे भोजन व्हायला पाहिजे. म्हणूनच साधू संतांनी हे साहित्य लिहून ठेवले आहे,' असे जनार्दनपंत बोथे गुरुजी म्हणाले.

#### हे विदर्भाचे भाग्य - जितेंद्रनाथ महाराज

भजने पौरुष, आदर्श, प्रेरणा निर्माण करण्याचे काम करतात. या भजनांच्या माध्यमातून मनाच्या, भावनांच्या लहरी कशा असाव्यात हे राष्ट्र संतांनी लिहून ठेवले. भारत एक मंदिर आहे असं महाराजांनी म्हटलं आहे. त्यामुळे गुरुदेवांसारखे संत लाभले हे विदर्भाचे भाग्य आहे, असे जितेंद्रनाथ महाराज म्हणाले.

## आमदार फुकेंच्या ताफ्यातील वाहनाने युवकाला चिरडले



■ महासागर प्रतिनिधी
गोंदिया, दि. १९ :
विधान परिषद सदस्य परिणय फुके यांच्या ताफ्यातील पोलीस वाहन आणि विरूद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीची धडक होऊन घडलेल्या भीषण अपघातात गोरेगाव येथील एका तरुणाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याची घटना आज शनिवार १९ जुलै रोजी गोरेगाव तालुक्यातील हिरडामाली येथे दुपारी १२ घडली.

अरविंद चव्हाण वय (३६) रा. महाजनटोली, गोरेगाव असे या अपघातातील मृत तरुणाचे नाव आहे. हा तरुण गोंदियाकडून गोरेगावकडे येत असताना आमदार परिणय फुके यांचा ताफा गोंदियाकडे जात होता.

ताफ्यातील पायलट पोलीस वाहन व तरुणाची दुचाकीत जोरदार धडक झाली. यातच तरुण गंभीर जखमी झाला. आमदार परिणय फुके यांनी जखमीला गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय रुग्णालयात पाठविले. त्याला डॉक्टरांनी मृत घोषित केले.प्रकरण गोरेगाव पोलिसांनी दाखल केले आहे.पुढील तपास गोरेगाव पोलिस करत आहे.

शनिवार १९ जुलै रोजी गोंदिया जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिवाची निवड करण्यात येणार होती. गोंदिया जिल्हा बँकेची निवडणूक ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार ) आणि भारतीय जनता पक्ष यांनी युती करून लढविली होती. शनिवारी अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव निवड करण्यापूर्वी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष अजित पवार आणि भाजपच्या गोंदिया जिल्ह्यातील महत्त्वपूर्ण पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत सहभागी होण्यासाठी आमदार परिणय फुके नागपूर वरून गोंदियाला जात असताना त्यांच्या ताफ्यातील पायलट वाहनाने विरुद्ध दिशेने येणाऱ्या दुचाकीला धडक दिली.

**अपघाती मृत्यू**

तिरोडा ते खैरलांजी मार्गावर भरधाव दुचाकीने धडक दिल्याने रात्रीच्या जेवणा नंतर शतपावली करित असलेल्या संतोष अलमचंदानी यांचा मृत्यू झाला. दुचाकीवरील तीन जण जखमी झाले असून यातील एक गंभीर जखमी आहे. संतोष द्वारकादास आलमचंदानी (५१ वर्ष) हे रस्त्याचे कडेने शतपावली करित असता भरधाव दुचाकीने त्यांना जबर धडक दिली. प्राथमिक उपचारा नंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

### वारसा प्रदर्शन आणि विद्यार्थ्यांच्या स्पर्धांसह

## नागपूर रेल्वे स्थानकाचा शताब्दी महोत्सव साजरा













■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातर्फे नागपूर रेल्वे स्थानकाच्या १०० वर्षांच्या गौरवशाली इतिहासाचा भव्य शताब्दी महोत्सव आज उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने स्थानक परिसरात खास वारसा प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते, ज्यात भारतीय रेल्वेचा अतीत ते वर्तमान प्रवास दाखवण्यात आला.

या प्रदर्शनात वाफेच्या व डिझेल इंजिनचे मॉडेल्स, जुन्या ट्रेन संचालन साधनांचा समावेश, नॅरो गेज युगातील वस्तू, जुने स्टेशन टाइल्स आणि स्थानकाच्या परिवर्तनाची झलक दाखवणारे विविध प्रदर्शन ठेवण्यात आले होते. प्रवासी, रेल्वे प्रेमी आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी या समृद्ध वारशाचे कौतुक केले.

या शताब्दी सोहळ्याचा एक भाग म्हणून शहरातील विविध शाळांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले. माय हेरिटेज रेल्वे स्टेशनह्व या विषयावर चित्रकला स्पर्धा आणि नागपूर रेल्वे स्थानकाचा गौरवशाली इतिहासह्व या विषयावर निबंध लेखन स्पर्धा घेण्यात आल्या, ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आपल्या शहराच्या ऐतिहासिक स्थानकाबद्दल अभिमान आणि जागरूकता निर्माण झाली. शेकडो विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि रंगीत चित्रे व भावस्पर्शी निबंधांच्या माध्यमातून आपले विचार मांडले. विद्यार्थ्यांची इतिहास व वारशाबाबतची जाण स्तुत्य होती.

मध्य रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी यांनी विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेची व सहभागाची प्रशंसा केली. या उत्साहातून नागपूरकरांचे आपल्या ऐतिहासिक स्थानकाशी असलेले भावनिक नाते अधोरेखित झाले. हा शताब्दी सोहळा केवळ नागपूर स्थानकाच्या वैभवशाली इतिहासाचा गौरव करत नाही, तर भविष्यातील पिढ्यांना ह्या वारशाची जपणूक करण्यासाठी प्रेरणा देतो.

## डॉ. बाबासाहेब आकरे कुशल संघटक म्हणून प्रेरणास्थानी





### डॉ. सतीश वटे यांचे प्रतिपादन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १९ :
सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रातील अग्रगण्य तसेच विद्यार्थी युवक क्रीडा मंडळाचे संस्थापक डॉ.बाबासाहेब आकरे म्हणजे कुशल संघटक कसा असावा याचे मूतीर्मंत उदाहरण आहे.त्यांनी भागीदारी व सर्वसमावेशकता हे खेळाचे अविभाज्य घटक असल्याचे सांगितले असे प्रतिपादन नीरी संस्थेचे माजी संचालक डॉ. सतीश वटे यांनी केले.

औचित्य होते प्रेस क्लब येथे आयोजित डॉ. बाबासाहेब आकरे स्मृती क्रीडा पुरस्कार वितरण समारंभाचे. यावर्षीचा हा पुरस्कार स्पोर्ट्स जर्नलिस्ट असोसिएशन ऑफ नागपूर या नागपुरातील क्रीडा पत्रकार संघटनेचे अध्यक्ष नरेश शेळके व पदाधिकाऱ्यांना प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व खेळाडू विजय बारसे यांच्या हस्ते देण्यात आला. ११ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह हे पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी वनराईचे विश्वस्त डॉ. गिरीश गांधी, प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र उपस्थित होते.

यावेळी डॉ. सतीश वटे पुढे म्हणाले की, कोणत्याही प्रश्नाचे शांतपणे समाधान काढणे आणि ध्येय साध्य करणे हा त्यांच्या दूरदृष्टीचा पाया होता. यावेळी नरेश शेळके पुरस्काराला उत्तर देताना म्हणाले की, कोणतीही संघटना सुरू करणे सोपे आहे पण ती चालविणे तेवढेच कठीण आहे. खेळ व खेळाडूंसाठी काहीतरी करायचे या प्रेरणेने ही संघटना उभी राहिली. या संघटनेशी १४ शहरातील क्रीडा संघटना जुळल्या आहेत त्यात सर्वोत्तम संघटना म्हणून या संस्थेची ख्याती आहे,खेळ व खेळाडूना मोठे करायचे असेल तर माध्यमांना जवळ केले पाहिजे असे ते म्हणाले.

यावेळी प्रसिद्ध खेळाडू व सामाजिक कार्यकर्ते विजय बारसे यांनी आपले विचार मांडले. सभागृहात दैनिक महासागरचे मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, गिरीश गांधी फाउंडेशनचे सचिव निलेश खांडेकर व अनेक मान्यवर उपस्थित होते. संचालन शुभदा फडणवीस यांनी केले.

## वीज पडून मृत्यू

■ अमरावती : मोर्शी नजिकच्या पिंपळखुटा (लहान) येथे शेत शिवारात वीज पडून ५२ वर्षीय शेतकऱ्याचा घटनास्थळी मृत्यू झाला.

मृत शेतकरी तालुक्यातील निंभी येथील रहिवासी असून त्यांची ओळख मधुकर मुकुंदराव पैठणकर अशी झाली आहे. शनिवार, १९ जुलैला दुपारी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

## गोविंद पर्व कारखाना राणा शिपिंग कंपनीकडे सुपूर्द

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. १९ :
सोलापूर जिल्ह्याच्या राजुरी येथील गोविंद पर्व कारखाना अखेर राणा शिपिंग कंपनीकडे अधिकृतरीत्या सुपूर्द करण्यात आला आहे.

हा कारखाना सेवानिवृत्त शिक्षक, आदिनाथ साखर कारखान्याचे माजी संचालक लालासाहेब जगताप यांनी जिल्हा बँकेकडून कर्ज घेऊन सुरू केला होता. मात्र, तांत्रिक अडचणींबरोबरच चुकीच्या व्यवस्थापनामुळे हा कारखाना बंद पडला आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेचे कोट्यवधी रुपये थकीत होते.
कर्जवसुलीसाठी जिल्हा बँकेने राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाच्या मुंबई खंडपीठात याचिका दाखल केली होती. निकाल बँकेच्या बाजूने लागल्यावर रिझोल्यूशन प्रोफेशनलची नियुक्ती करण्यात आली. गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या कायदेशीर प्रक्रियेनंतर राणा शिपिंग कंपनीने निविदा रक्कम भरून कारखाना विकत घेतला. सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणी दूर केल्यानंतर सर्व कागदपत्रांसह कारखान्याचा ताबा १७ जुलै २०२५ रोजी राणा शिपिंगकडे हस्तांतरित करण्यात आला.

या विक्रीतून जिल्हा बँकेचे सुमारे पावणे पाच कोटी रुपये वसूल झाले असून उर्वरित कोट्यवधी रुपयांची वसुली संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेतून करण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. राणा सूर्यवंशी हे पूर्वी कंपनीशी संबंधित होते. पण त्यांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. योग्य वेळी जिद्दीने ताब्यात घेतला. यापुढे तेच ह्या कारखान्याचे संचालन करणार आहेत.

## नशामुक्त भारतासाठी कोलते महाविद्यालयाचा सामाजिक पुढाकार



■ महासागर प्रतिनिधी
मलकापूर/बुलढाणा, दि. १९ :
पद्मश्री डॉ. व्ही. बी. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय, मलकापूर येथे दिव्य ज्योती जागृती संस्थान, आय.क्यू.ए.सी. आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने नशा उन्मूलन जनजागृती कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.

या विशेष उपक्रमासाठी आध्यात्मिक प्रवक्त्या, युवा मार्गदर्शिका तथा व्हायोलिनवादक साध्वी सुश्री रुचिका भारती,अमरावती शाखा प्रमुख साध्वी सुश्री शुभप्रदा भारती यांना मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्यासमवेत डॉ. जयश्री खर्चे यांचीही उपस्थिती लाभली.
दिव्य ज्योती जागृती संस्थेचे संस्थापक व संचालक आशुतोष महाराज यांच्या आध्यात्मिक आशीर्वादाने हा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नैतिक मूल्ये आणि नशा उन्मूलनाबाबत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

दीपप्रज्वलन व माँ सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी प्रमुख अतिथी साध्वी सुश्री रुचिका भारती यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत केले. आय.क्यू.ए.सी. प्रमुख प्रा. रमाकांत चौधरी यांनी साध्वी शुभप्रदा भारती यांचे स्वागत केले.
साध्वी सुश्री रुचिका भारती यांनी अत्यंत प्रभावी शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांनी जीवनातील नशेचे दुष्परिणाम, आत्मविकास, मानसिक स्वास्थ्य आणि नकारात्मक सवयींपासून दूर राहण्याची प्रेरणा दिली. आध्यात्मिक दृष्टीकोनातून आत्मसंयम व आत्मबल वाढवण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

साध्वी शुभप्रदा भारती यांनी समाज व राष्ट्राच्या उन्नतीसाठी तरुणाईने नशा मुक्त जीवन स्वीकारणे कसे आवश्यक आहे, हे उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमादरम्यान आपल्या वैयक्तिक व सामाजिक समस्यांवर अतिथींशी संवाद साधला.

संचालन प्रा. अंकुश नारखडे यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. सचिन बोरले, प्रा. अभिजीत अग्रवाल, प्रा. प्रविण पाटील, प्रा. सुदेश फरपट, प्रा. अमोल हलदे, प्रा. सचिन भोळे, प्रा. मनीष अचलिया, प्रा. योगेश जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. अनिल खर्चे यांनी अतिथींना धन्यवाद देत महाविद्यालयात अशा सामाजिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन पुढेही होत राहील, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे अध्यक्ष ज्ञानदेव पाटील, सचिव डॉ. अरविंद कोलते यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या उपक्रमाने विद्यार्थ्यांमध्ये नशा उन्मूलनाबाबत सकारात्मक विचार रुजवले गेले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालय प्रशासन, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त
पदमश्री डॉ. वि. भि. कोलते अभियांत्रिकी महाविद्यालय
मलकापूर जि. बुलडाणा ४४३१०१
(ME, EE, CE)
शैक्षणिक वर्ष २०२५–२६ साठी प्रवेश सुरू
। डिप्लोमा। । बी.ई.। । एम.ई.।
◆ मेकॅनिकल इंजीनिअरिंग ◆ सिव्हील इंजीनिअरिंग
◆ इलेक्ट्रिकल इंजीनिअरिंग ◆ कॉम्पुटर सायन्स अॅड इंजीनिअरिंग
संपर्क: ०७२६७२२६७००/२९५०३७, ८९८९२२९८९८, ९७६६११८९४०, ९७६६९३५१९८
प्राचार्य डॉ. अनिल खर्चे
www.coemalkapur.ac.in
coemalkapur@rediffmail.com
S.M GRAPHICS GFX ✆ +91 7841098284